# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## शेतक–यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश, जिल्हा–रत्नागिरी/सिंधुदुर्ग

## (कालावधी – जानेवारी – फेब्रुवारी, )

### (जानेवारी पहिला पंधरवडा)

अ) वायंगणी भात (सिंधुदुर्ग)

१. नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ४० किलो प्रमाणे भात पिकास द्या.
२. पाणी वाहते राहील या बाबीकडे लक्ष द्या.
३. रोग व किडीच्या प्रादुर्भावाबाबत निरीक्षण करा.

ब) उन्हाळी भात

१. भात लागवड राहिली असल्यास पूर्ण करा.
२. रोपवाटिकेतील खोडकिडग्रस्त रोपे काढून नष्ट करा व भात लागवड करण्यासाठी क्लोरोपायरीफॉस ( ईसी २०टक्के) द्रावणात (२ मि.ली प्रति लिटर) रोपे २४ तास बुडवून नंतर लागवड पूर्ण करा.
३. जमिनीच्या मगदूराप्रमाणे ४ ते ६ दिवसांनी पाणी द्या.

क) कडधान्ये

१. पिकांचे मोकाट जनावरांपासुन संरक्षण करा.
२. फुलो–यापूर्वी/फुलो–यांच्या काळात व शेंगा भरताना पिकास पाणी द्या.

### (फेब्रुवारी दुसरा पंधरवडा)

अ) वायंगणी भात (सिंधुदुर्ग)

१. भात खाचरात नियमित पाणी खेळते ठेवा.
२. पाण्याची उपलब्धता पाहून  नत्र खताचा तिसरा हप्ता हेक्टरी ४० किलो द्या.
३. पिक संरक्षणाकडे लक्ष द्या.

ब) उन्हाळी भात

१. भात लावणी राहिली असल्यास पूर्ण करा.
२. लावणी झालेल्या क्षेत्रात २.५ से.मी.पाण्याची पातळी ठेवा.
३. लावणी होवुन महिना झालेल्या क्षेत्रास हेक्टरी ४० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्या.

पीक संरक्षण

अ) करपा रोग दिसून आल्यास पुढीलप्रमाणे उपाय योजना करावी.

ब) प्रति हेक्टरी १ किलो कार्बेन्डेझीम किंवा १.२५० किलो कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.

क) खोडकिडा

या किडीचा उपद्रव दिसून आल्यास खालीलपैकी एका दाणेदार कीटकनाशकाची मात्रा द्यावी.

१) १० टक्के फोरेट प्रति हेक्टरी १० किलो किंवा

२) ५ टक्के क्विनॉलफॉस प्रति हेक्टरी १५ किलो  किंवा ३ टक्के कार्बाफयुरॉन प्रति हेक्टरी १६.५ किलो किंवा

३) दाणेदार किटकनाशके औषध वापरणे शक्य नसल्यास किंवा पुरेसा ओलावा भात खाचरात नसल्यास खालीलपैकी एका किटकनाशकाची फवारणी  हेक्टरी ५०० लि. पाण्यातून करावी.

१. कारटॅप हायड्रोक्लोराईड ५० टक्के ६०० ग्रॅम
२. क्विनॉलफॉस २५ ई.सी. १००० मि.ली.
३. ट्रायझोफॉस ४०टक्के १३५० मि.ली.

पाने गुंडाळणारी अळी/तपकिरी तुडतुडे

या कीडीचा उपद्रव दिसून आल्यास पुढीलपैकी एका कीटकनाशकाची ५०० लि. पाण्यातून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करा.

१. ७०० मि.ली. ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस
२. ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम
३. कारटॅप हायड्रोक्लोराईड ५०० ग्रॅम
४. क्लोरोपायरिफॉस २०टक्के १८७५ मि.ली
५. क्विनॉलफॉस २५ टक्के १००० मि.ली.

कडधान्ये

१. वाल, चवळी, उडीद, मूग इत्यादी पिकांना आवश्यकतेनुसार पाणी द्या.
२. पक्व शेंगांची काढणी करा.
३. चवळी, उडीद, मूग, कुळीथ पिकांवरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी १० लि. पाण्यात २० ग्रॅम गंधकाची फवारणी करावी.

भुईमुग

१. जमिनीच्या मगदुराप्रमाणे नियमित ७ ते १० दिवसांचे अंतराने पाणी द्या.
२. मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रिड १७.८ टक्के १२५ मिली. ५०० लि. पाण्यातून १ हे. क्षेत्रावर फवारावी. किंवा मिथील पॅरॉथिऑन २ टक्के भुकटी २५ कि. प्रति हेक्टरी वारा शांत असताना धुरळावी.
३. शेंडे मर दिसून आल्यास रोगग्रस्त झाडे समुळ उपटून त्यांचा नाश करावा.

## उद्यानविद्या

आंबा

१. आंबा कलमांना आधार द्या. नियमित पाणी द्या. त्यासाठी ठिबक संचाचा वापर करा व कलमांचे मोकाट गुरांपासुन संरक्षण करा.
२. मोठया आंबा कलमांवर जानेवारीच्या तिसऱ्या आठवडयात किटकांचे निरिक्षण करुन वेळापत्रकानुसार किटकनाशक व रोगनाशकाची फवारणी करा.

नारळ

१. नारळाभोवतालच्या अळयातील माती हलवून सारखी करा. जमिनीच्या मगदूराप्रमाणे चार ते पाच दिवसांनी पाणी द्या व खते देण्याची पूर्वतयारी करा.
२. नारळाची झाडे खताला चांगला प्रतिसाद देतात. त्यामुळे नारळाला लागवडीपासुन दरवर्षी खालीलप्रमाणे खतांची मात्रा देणे आवश्यक आहे.

| झाडाचे वय | शेणखत | युरीया (ग्रॅम) | सुपर फॉस्फेट | म्युरेट ऑफ पोटॅश (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| लागवडीचे वर्ष | | | | |
| १ वर्षानंतर | १ घमेले | ५०० | ६०० | ३२० |
| २ वर्षानंतर | २ घमेली | १००० | १२०० | ६४० |
| ३ वर्षानंतर | ३ घमेली | १५०० | १८०० | ९६० |
| ४ वर्षानंतर व पुढे दरवर्षी | ४ घमेली | २००० | २४०० | १२८० |
| ५ वर्षानंतर व पुढे दरवर्षी | ५ घमेली | २२२५ | ३००० | १६०० |

खते जमिनीवर पसरुन ती मातीत मिक्स करा व नंतर लगेच पाणी द्या.

पीक संरक्षण— नारळाच्या कोवळया पानावर बुरशीजन्य करपा रोग येतो. या बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण २०—२१ दिवसाच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात.

सुपारी

१. सुपारीच्या बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्या.

२. तीन वर्षापेक्षा मोठया पोफळीस ७५ ग्रॅम नत्र अधिक ७५ ग्रॅम पालाश रिंगण पध्दतीने माडाभोवती मातीत मिसळून द्यावे.

३. तयार सुपाऱ्या काढून घ्या. पोफळे उन्हात चांगले वाळवून घ्या.

४. पर्णठिपके आणि फुलगळ या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास ५०० ग्रॅम कार्बेडेझीम अथवा ५०० ग्रॅम बेनोमिल ५०० लीटर प्रति हेक्टरी पाण्यातून पानांवर आणि फुलोऱ्यावर फवारावे.

५. बुंधाकूज (अनाबेरोग) रोगाची लागण दिसून आल्यास अशी झाडे त्वरित मुळापासून काढून नष्ट करावीत आणि अशा ठिकाणी १ किलो गंधक. १ किलो मळीचा चुना यांचे मिश्रण जमीनीत पसरुन खड्डा भरा

काजू

१. फांद्यांवर मर दिसुन आल्यास (डायबॅक) फांदया कापून काढा व १:१:३० या प्रमाणातील बोर्डोपेस्ट लावा.

२. काजू कलमांच्या जोडाखालून येणारी फुट काढून टाका.

लवंग

लवंगाच्या गुच्छातील पूर्ण वाढलेल्या किंवा पिवळसर गुलाबी कळया काढून वेगळया करुन सावलीत वाळवा.

भाजीपाला

१. चुका, चाकवत, मुळा, पालक, मेथी या पालेभाज्यांची विक्री होईल त्या प्रमाणात प्लॉटमध्ये परत पेरणी करा.

२. पालेभाज्यात ५ ते ६ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी दया.

३. वांगी, मिरची, टोमॅटो या पिकांना ६—७ दिवसांनी पाणी दया. तसेच रोपांजवळ मातीची भर करा.

कलिंगड

१. नियमित ३ ते ४ दिवसांचे अंतराने पाणी दया. पाण्याच्या अनियमित पाळयामुळे फळे तडकण्याची शक्यता असते.

२. कलिंगडाच्या पानांवर भुरी रोग दिसुन आल्यास पाण्यात मिसळणारी मॅन्कोझेब भुकटी (७५ टक्के) २० ग्रॅम किंवा कॅरेथॅन १० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

३. फळमाशी नियंत्रणासाठी प्रति हेक्टरी ४ रक्षक सापळे लावावेत.

४. पिकावर शेंडेमर रोगाचा प्रादुर्भाव झालेले वेल त्वरित उपटून जाळावेत.

५. वाढत्या फळाच्या तळाशी व वरुन गवताचा/भाताच्या पेंढयाचे आच्छादन करा.

वैरणीची पिके

१. वैरणीसाठी मक्याची पेरणी करा. त्यासाठी आफ्रिकन टॉल जातींची निवड करा. बियाणे प्रति हेक्टरी — ७० किलो आणि पेरणीचे अंतर — ३० सेमी

२. सेंद्रीय खते — प्रति हेक्टरी २० गाडया शेणखत.

३. नत्र (पहिला हप्ता) ७५ किलो स्फुरद ६० किलो व पालाश ६० किलो.

पशुसंवर्धन

१. दुभत्या जनावरांना ओला चारा देण्याची व्यवस्था नसल्यास ‘अ’ जीवनसत्व खाद्यातून द्या.

२. गुरांचे गोठे स्वच्छ ठेवा. मलमूत्र गोठयापासून दूर साठविण्याची व्यवस्था करा.

सामाजिक वनीकरण

१. लावलेल्या झाडांचे वणव्यापासुन व इतर उपद्रवी प्राण्यापासून संरक्षण करा.

२. पुढील हंगामासाठी रोपवाटिका तयार करा.

३. उपयुक्त झाडांचे बियाणे गोळा करा.

मत्स्य संवर्धन

१. निमखा–या पाण्यातील मत्स्य संवर्धनाकरीता कोळंबीची वाढ पूर्ण झालेली आढळल्यास (४० ते ५० ग्रॅम/नग) कोळंबी विक्रीसाठी काढा.

२. कोळंबी काढून झाल्यावर तलावाच्या तळाची पूर्व मशागत करुन बिजाचे साठवणूक करण्यासाठी तयारी पूर्ण करा.

३. बीजोत्पादन केंद्रातुन कोळंबीच्या बीजाची मागणी नोंदवून बीज उपलब्ध करा आणि बीजाची साठवणूक संवर्धन तलावात करा.

४. तलावामध्ये प्रती हेक्टरी ५० कि. चुना आणि ३००० कि. शेणाचा वापर करा.

५. गोडया पाण्यातील संवर्धनासाठी तलावातील माशांची वाढ तपासून त्यांच्या वजनाप्रमाणे पूरक खाद्यांच्या मात्रा द्या.

६. भात खाचरातील मत्स्य संवर्धनाकरीता सिप्रिनस कार्प तसेच जिताडा या माशांच्या बिजांची मागणी नोंदवा आणि मत्स्य बीज साठविणीसाठी भात खाचराची तयारी करा.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

शेतक–यांना शेती कामासंबधी द्यावयाचे संदेश

(जिल्हा– सिंधुदूर्ग/रत्नागिरी)

( कालावधी – फेब्रुवारी – मार्च )

भात

वायंगणी– ( सिंधुदूर्ग जिल्हा )

१. भात खाचरात पाणी खेळते ठेवा.

२. नत्राचा तिसरा हप्ता हेक्टरी २० किलोग्रॅम नत्र या प्रमाणात द्या.

३. पीक संरक्षणाकडे लक्ष द्या.

उन्हाळी भात

१. लावणी होवून महिना झालेल्या क्षेत्रात बेणणी करा व नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ४० किलोग्रॅम नत्र या प्रमाणात द्या.
२. नियमित ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्या.
१) करपा या रोगाचा उपद्रव दिसून आल्यास ट्रायसायक्लॅझोल ५०० ग्रॅम ५०टक्के १२५० ग्रॅम या बुरशीनाशकाची ५०० लि. पाण्यातून फवारणी करावी.
२) पाने गुंडाळणारी अळी या किडीचा उपद्रव दिसून आल्यास पुढीलपैकी एका औषधाची फवारणी ५०० लि. पाण्यातून करावी.
१. ७०० मि.ली. मोनोक्रोटोफास ३६ टक्के ई.सी.
२. ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम.
३. कारटप हायड्रोक्लोराईड ५० टक्के ५०० ग्रॅम
४. क्विनालफास २५ टक्के १००० मि.ली.

तपकिरी तुडतुडे

सतत पाणी साचणाऱ्या भात खाचरात या किडीचा उपद्रव दिसून येतो. किडींच्या नियंत्रणासाठी प्रथम पाण्याचा निचरा करावा. आणि खालीलप्रमाणे उपाय योजना कराव्यात.

उपाय– ॲसिफेट ७६ टक्के ६६० ग्रॅम किंवा कार्बारिल ५० टक्के २००० ग्रॅम किंवा डायक्लोरव्हॉस ७६ टक्के ४७० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ टक्के १००० मि.ली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १०० मिली यापैकी एका किटक नाशकाची हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फवारणीचेवेळी दोन माणसांची मदत घ्यावी. एक फवारणीसाठी आणि दुसरा भाताचे चुड उघडे करण्यासाठी, फवारणी चुडाच्या बुंध्यावर पडेल असे पहावे. फवारणी चुडाच्या बुंध्यावर करावी कारण तुडतुडे चुडाच्या बुंध्याकडे असतात.

कडधान्ये –

१. वाल,उडीद, चवळी, कुळीथ यापैकी पक्व पिकाची काढणी करा.

२. खळयात शेंगा वाळवून मळणी करा.

३. कडधान्ये चांगले वाळू द्या.

४. बियाणासाठी ठेवावयाच्या कडधान्याना करंजाचे तेल लावा. प्रमाण १० मि.ली./किलो बियाण्यास

तेलबिया (भुईमूग)

१. जमिनीच्या मगदुराप्रमाणे नियमित ७ ते ८ दिवसानी पाणी द्या.

२. मावा किडीचा उपद्रव दिसून आल्यास इमिडॅक्लोप्रिड १७.८ टक्के १२५ मिली/५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरीवर फवारावे किंवा मिथील डिमेटॉन २ टक्के भुकटी २५ किलो /हेक्टरी वारा शांत असताना धुरळावी

३. पिकावर येणाऱ्या टिक्का आणि तांबेरा रोगांच्या एकत्रित नियंत्रणासाठी प्रोपिकोनॅझोल या बुरशीनाशकाची फवारणी प्रती १० लिटर पाण्यात १० मि.ली. याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने ३ फवारण्या घ्याव्यात.

*फलोद्यान*

आंबा

१. नवीन कलम लागवडीस नियमित पाणी द्या. त्यासाठी ठिबक संचाचा वापर करा. खोडालगत गवताचे आच्छादन करा.

२. या कलमाचे मोकाट जनावरे, जंगली जनावरे व वणव्यापासून संरक्षण करा.

३. मोहोर आलेल्या आंबा कलमांची झाडणी करा जेणेकरुन सुकलेली फुले गळून पडतील.

४. कलमांभोवती अग्निरोधक पट्टा काढा.

५. आंबा बागेतील वाळलेला व गळून पडलेला मोहोर, पाने व इतर काडीकचरा गोळा करुन नष्ट करा.

६. माकडे, पक्षी, खार इत्यादीपासून आंबा फळाचे रक्षण करा.

७. आंबा मोहोर संरक्षणासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात आंबा कलमावर मोहोराच्या परिस्थितीनुसार किटकनाशकाच्या वेळापत्रकानुसार फवारणी करावी. औषध फवारणीचे द्रावणात २ टक्के युरिया चांगला विरघळून फवारावे.

८. फळमाशीच्या नियंत्रणासाठी रक्षक सापळे वापरा. गळून पडलेली फळे गोळा करुन जाळून नष्ट करा. आंब्याचे फळ साधारण आठ ते दहा आणे झाल्यापासून रक्षक सापळे लावावेत. साधारण सहा आठवडयानी सापळयातील आमिष बदलावे एका हेक्टरमध्ये कमीतकमी चार सापळे लावा.

टिप – सध्याचे हवामान लक्षात घेता थंडीची लाट अशीच राहील्यास पुर्नमोहोराचे प्रमाण वाढण्याची शक्यता

आहे. तसेच भुरी रोगाचा प्रादुर्भाव व फळगळ वाढण्याची शक्यता आहे.

- पुरेसा मोहोर आलेल्या झाडावर ५० पीपीएम जीब्रेलीक आम्लाची फवारणी करावी.
- फलधारणा वाढण्यासाठी १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाण्याच्या आकाराची, सुपारीएवढी, अंडाकृती असताना करावी.
- शक्य असल्यास पुर्ण वाढलेल्या व फलधारणा झालेल्या आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या २ पाळया १५ दिवसांच्या अंतराने द्याव्यात.
- भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझॉल ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे गंधक २० ग्रॅम किंवा ट्रायडीमेफॉन १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

नारळ

पानांवर तपकिरी ठिपक्याचा बुरशीजन्य रोग आढळल्यास एक टक्का बोर्डोमिश्रण किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड एक लिटर पाण्यात २.५ ग्रॅम ( ०.२५ टक्का ) या प्रमाणात मिसळून फवारणी करा.

सुपारी ( अनाबे रोग )

१. बागेतील पाण्याचा योग्य निचरा करा.
२. रोगग्रस्त पोफळी मुळासकट काढून जाळून नष्ट करा.
३. त्याच खडडयात पोफळी लावण्यापूर्वी १:१ प्रमाणात गंधक व चुन्याची भुकटी १ किलो मिसळून टाका. त्याच जागेवर परत सहा महिने पर्यन्त रोपे लावू नका.
४. लागण झालेल्या पोफळीना पावसापूर्वी एक व पावसाळयात महिन्याच्या अंतराने ३ वेळा २ टक्के बोर्डोमिश्रण किंवा ०.३ टक्के कॅप्टन ( ०.३ ग्रॅम/लिटर) बुरशीनाशकाच्या द्रावणाची बुंध्यालगत भिजवण करा.

भाजीपाला

वांगी, मिरची या पिकावर, फुलकिडे व पांढरी माशी या किडीमुळे रस शोषणाबरोबरच चुरडा/मुरडा/बोकडया रोगाचा फैलाव होण्याची शक्यता असते. यावर उपाय म्हणून फेनपोपॅथ्रिन ३० टक्के १७०मिली. ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरी फवारावे.  मावा सआणि तुडतुडयांच्या नियंत्रणासाठी रोपवाटीकेत फोरेट १० टक्के १०० ग्रॅम/प्रती गुंठा या प्रमाणात जमीनीत पुरेसा ओलावा तपासून मातीत मिसळावे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक १० लिटर पाण्यात २० ग्रॅम मिसळून फवारणी करा. वेलवर्गीय भाजीपाला पिकांवरील विषाणूजन्य रोगग्रस्त झाडे उपटून त्याचा नाश करावा.

कलिंगड

१. तयार फळांची काढणी करा.
२. ३ ते ४ दिवसाच्या अंतराने पाणी द्या. वाढणाऱ्या फळांवर व खाली गवताचे आच्छादन करा.
३. शेंडेमर रोगाच्या नियंत्रणासाठी फुलकिंडीचा बंदोबस्त करावा.
४. फळमाशीच्या नियंत्रणासाठी रक्षक सापळे फळ लागणीच्या सुरुवातीपासूनच वापरा.  तसेच सापळयातील क्यूल्युअर आमिष आवश्यकतेनुसार बदला.

काळीमिरी

१. तयार लोंगर काढून घ्या.
२. मणी वेगळे करुन उकळत्या पाण्यात १ मिनीट बुडवून प्रक्रिया करा व उन्हात ३ ते ४ दिवस वाळवा.
३. काळीमिरीच्या रोपांची रोपवाटीका करा.

दालचिनी

१. दालचिनीचे नवीन झाड ३ वर्षाचे झाले असल्यास ते २० से.मी. उंचीवर कापून त्यापासून साल काढा व ती सावलीत वाळवा.  झाड कापण्याआधी १ चौ.से.मी. आकाराचा सालीवर काप घेवून साल खोडापासून लवकर विलग होते याची खात्री करुन मगच अशी झाडे कापावीत.
२. नवीन कलमांना आधार द्या.  ३.  ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्या.

सामाजिक वनीकरण

१. लागवड झालेल्या क्षेत्रातील रोपांचे उनाड/भटक्या/मोकाट जनावरापासून व इतर उपद्रवी प्राण्यापासून संरक्षण करा.
२. वणव्यापासून रोपांचे संरक्षण करा.
३. खैर, साग, काजू, रिठा, शिवण व इतर महत्वाच्या जंगल झाडांचे बियाणे मिळवा.
४. रोपांचे मागणीनुसार रोपवाटीका तयार करा.

पशुसंवर्धन

१. वैरणीसाठी पेरलेला मका (६५ ते ७० दिवसांनी) फुलो—यावर आला असता या पिकाची कापणी करा. सायलेज करणे शक्य असल्यास पुढील हंगामासाठी सायलेज पध्दतीने साठवण करा.
२. पाणी पुरवठा पुरेसा असल्यास नवीन पेरणीसाठी प्लॉट तयार करा.
३. दुभत्या गायी, म्हैशी व बैल या जनावरांची काळजी घ्या. त्यांना ओला चारा व संतुलीत खुराक द्या.
४. भाताचा पेंढा आणि वाळलेले गवताची पौष्टीकता वाढविण्यासाठी युरिया प्रक्रीया करा.
५. गोठे स्वच्छ ठेवा. गोचिडयापासून गुरांचे संरक्षण करा. त्यासाठी केसांचे उलट दिशेने ५ टक्के मॅलेथिऑन भुकटी लावावी. अर्ध्या तासाने ती धुवून काढा.
६. आजारी जनावराना वेगळे बांधा व डॉक्टरांचे सल्याने त्वरीत औषध योजना करा.

मार्च पहिला पंधरवडा

भात – अ. वायंगणी भात ( सिंधुदूर्ग जिल्हा )

१. पक्व भाताची वैभव विळयाने कापणी करा. त्यामुळे अधिक पेंढा मिळेल, तसेच खोड किडीचा पुढील हंगामातील उपद्रव कमी होईल.

२. उन्हात पेंढया चांगल्या वाळू द्या.

३. उंदरापासून त्रास होणार नाही अशा ठिकाणी उडवी रचा. उंदरांचा प्रादुर्भाव दिसल्यास उंदीर विष(झिंक फॉस्फेट) असलेल्या खाद्याचा वापर करा. मेलेले उंदीर पुरुन टाका.

ब. उन्हाळी भात :

१. नत्राचा तिसरा हप्ता द्यावयाचा राहिला असल्यास हेक्टरी २० किलो ग्रॅम नत्र या प्रमाणात द्या.

२. ५ से.मी. पर्यन्त पाणी खेळते राहिल अशी व्यवस्था करा.

पाने गुंडाळणारी अळी :

या किडीचा उपद्रव दिसून येताच पुढीलपैकी एका औषधाची ५०० लिटर पाण्यातून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करा.

१. ७०० मि.ली. मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के ई.सी.

२. ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम.

३. कारटॅप हायड्रोक्लोराईड ५० टक्के ५०० ग्रॅम

४. क्विनॉलफॉस २५ टक्के १००० मि.ली.

५. ३६ ई.सी. मोनोक्रोटोफॉस ७०० मि.ली.

२. तपकिरी तुडतुडे आणि पानावरील तुडतुडे

सतत पाणी साचणाऱ्या भात खाचरात या किडीचा उपद्रव दिसून येतो. किडींच्या नियंत्रणासाठी प्रथम पाण्याचा निचरा करावा. आणि खालीलप्रमाणे उपाय योजना कराव्यात.

उपाय– ॲसिफेट ७६ टक्के ६६० ग्रॅम किंवा कार्बारिल ५० टक्के २००० ग्रॅम किंवा डायक्लोरव्हॉस ७६ टक्के ४७० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ टक्के १००० मि.ली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १०० मिली यापैकी एका किटक नाशकाची हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फवारणीचेवेळी दोन माणसांची मदत घ्यावी. एक फवारणीसाठी आणि दुसरा भाताचे चुड उघडे करण्यासाठी, फवारणी चुडाच्या बुंध्यावर पडेल असे पहावे. फवारणी चुडाच्या बुंध्यावर करावी कारण तुडतुडे चुडाच्या बुंध्याकडे असतात.

३. कडधान्ये

उडीद, वाल, चवळी, कुळीथ इत्यादी तयार कडधान्य पिकांची काढणी करा.

शेंगा उन्हात चांगल्या वाळू द्या.

कडधान्य पिकांची मळणी पूर्ण करा.

अमरवेलग्रस्त कडधान्य पिकाची काढणी स्वतंत्ररित्या करुन या शेतातील धान्य पुढील हंगामासाठी बियाणे म्हणून वापरु नये.

तेलबिया ( भूईमूग )

सात ते दहा दिवसानी नियमित पाणी द्या.

मावा व फुलकिडे या किडीचा उपद्रव दिसून आल्यास

इमिडॅक्लोप्रीड १७.८ टक्के १२५ मिली/५०० लि. पाण्यातून १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे किंवा मिथील पॅरॉथिऑन भुकटी २ टक्के २५ किलो वारा शांत असताना प्रती हेक्टरी धुरळावी.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश,

## (जिल्हा – सिंधुदुर्ग/रत्नागिरी)

## ( कालावधी – मार्च – एप्रिल )

---

### मार्च दुसरा पंधरवडा

भात

अ) वायंगणी भात – (सिंधुदुर्ग)

१. कापणी झालेल्या भातखाचरांत नांगरट करा.
२. धस्कटे काढून जाळून टाका व शेत मोकळे करा.
३. शेतातील बांध दुरुस्त करा.
४. खेकडयांची व उंदरांची बिळे बुजवून घ्या.

ब) उन्हाळी भात

१. नियमित ५ से.मी.पर्यन्त पाणी राहील याची व्यवस्था करा.
२. रोग व किडीचा बंदोबस्त मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवडयातील सुचनेनुसार करा.
३. खोड किडीचे वाळलेले पोंगे काढून नष्ट करा.
४. खोडकिडीचे अंडीपूंज दिसल्यास जमा करुन नष्ट करा.
५. ोतात पक्षी थांबे उभे करा.
६. पाने गुंडाळणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसल्यास प्रादुर्भावीत पाने अळयासकट गोळा करुन नष्ट करा. जास्त प्रादुर्भाव असल्यास मार्च महिन्यातील पहिल्या पंधरवडयात सुचविलेल्या किटकनाशकांचा वापर करा.

नागली (सिंधुदुर्ग)

नियमित पाणी द्या. परंतु पिकात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्या.

रोग व किडींच्या उपद्रवाकडे लक्ष द्या. .

कडधान्ये

१. साठवणीपूर्वी कडधान्ये चांगली वाळू द्या.
२. बियाणासाठी चांगले टपोरे, रोग व किडी मुक्त दाणे वेगळे ठेवा.
३. साठवणूकीपूर्वी अशा बियाणास प्रति किलो १० मि.ली.मोहरीचे किंवा करंजीचे तेल चोळून नंतर साठवण करा.
४. रोजच्या वापरासाठी लागणाऱ्या कडधान्यास प्रति किलोस ३ मि.ली खाद्यतेल चोळून हवाबंद डब्यात साठवण करा.

भुईमूग

१. जमिनीच्या मगदुराप्रमाणे सात ते दहा दिवसांनी पाणी द्या. मावा अथवा तुडतुडयांचा प्रादुर्भाव आढळल्यास इमिडॅक्लोप्रीड १७.८ टक्के १२५ मिली/५०० लि. पाण्यातून १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे किंवा मिथील पॅरॉथिऑन भुकटी २ टक्के २५ किलो वारा शांत असताना प्रती हेक्टरी धुरळावी.
२. टिक्का रोग दिसून आल्यास प्रोपिकोनॅझोल बुरशीनाशकाची १० मिली. १० ल्टिर पाण्यातून फवारणी करावी.

# एप्रिल पहिला पंधरवडा

आंबा

नवीन लागवडीतील कलमांना वयोमानाप्रमाणे पुढील प्रमाणात पाणी द्या.

अ) लागवडीनंतर पहिल्या वर्षी आठवडयातून एक वेळा २० लिटर पाणी ठिबक पध्दतीने.

ब) लागवडीनतर दुसऱ्या वर्षी १५ दिवसात एक वेळा २० लिटर पाणी ठिबक पध्दतीने.

क) लागवडीनंतर तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा ३० लिटर पाणी ठिबक पध्दतीने.

नव्या कलमांचे मोकाट जनावरे, जंगली प्राण्यापासून संरक्षण करा आणि वणव्यापासून संरक्षण करण्यासाठी अग्नीरोधक पट्टे काढा.

उशिरा आलेल्या मोहराचे तुडतुडे व भुरी रोगाचे संरक्षण करण्यासठी वेळापत्रकानुसार किटकनाशकाची व बुरशीनाशकाची गरज असल्यास फवारणी करा.

तांबडे कोळी किडीच्या प्रादुर्भावामुळे पानगळ होत असल्यास मोनोग्रोटोफॉस ३६ टक्के ११ मिली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पानाच्या दोन्ही बाजूने फवारणी करा.

फळमाशीचा उपद्रव कमीकरण्यासाठी डॉ.बा.सा. कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ''रक्षक'' सापळयाचा उपयोग करा.

पाण्याची बचत करण्यासाठी गवताच्या आच्छादनांचा वापर करा.

कलमांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करा.

तयार आंबे देठासहित काढण्यासाठी नूतन झेले मिळवा.

आंबा पॅकिंग व वाहतुकीसाठी विद्यापीठाने विकसित केलेल्या पुठठयाच्या खोक्याचा वापर करा.

काजू

१. तयार बिया गोळा करा व उन्हात चांगल्या वाळवा.
२. बागेतील रोगट व वाळलेलया फांद्या गोळा करुन बाग स्वच्छ ठेवा.
३. उशिरा लावलेल्या नवीन कलमांना आवश्यकता भासल्यास पाणी द्या. तसेच जोड आणि जोडाखालून खूंटापासुन येणारी फूट काढून नष्ट करा.
४. काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करा.

कोकम

१. तयार कोकम फळांची अलगद काढणी करा.
२. फळांपासुन आमसुले, कोकम सरबत, कोकम आगळ, कोकम मुठले तयार करा.

नारळ

१. मोठया झाडांना ठिबक सिंचनाद्वारे ४० लिटर/दिवस या प्रमाणात पाणी द्या.
२. बाग स्वच्छ ठेवा.
३. उंदरापासून माडांचे संरक्षण करा. त्यासाठी जमिनीपासून दोन मीटर उंचीवर खोडाच्या सभोवताली ३० से.मी.रुंदीचा गुळगुळीत पत्रा लावा.
४. झिंक फॉस्फाईड किंवा मुशमुश अमिषांचा वापर उंदीर मारण्यासाठी करा.

सुपारी

१. बाग स्वच्छ ठेवा व नियमित पाणी द्या.
२. दक्षिणेकडील उन्हांपासून पोफळीच्या खोडांचे संरक्षण करा. त्यासाठी गवत, सुपारीची पाने इत्यादिंचा वापर करा.

केळी

१. दर चार दिवसांनी नियमित पाणी द्या.
२. पसवलेल्या केळीस गरजेनुसार आधार द्या व फळांचे उन्हापासून नुकसान होऊ नये म्हणून उपाययोजना करा.

काळीमिरी

१. तयार मिरी काढून झाली असल्यास ६ मीटरवरच्या वेलीची छाटणी करा.
२. छाट पध्दतीने नवीन रोपे तयार करा. त्यासाठी बुंध्याकडे आलेल्या फांद्यांचा वापर करा.
३. बागेस पाणी नियमित द्या.
४. चांगली मिरी तयार होण्यासाठी कापडात बांधलेली मिरी उकळत्या पाण्यात फक्त एक मिनीट बुडवून प्रक्रिया करा व उन्हात ३ ते ४ दिवस वाळवा.

लवंग

१. लवंगाचे कळीचा घुमट फिक्कट पिवळसर झाल्यावर देठासहीत काढून उन्हात वाळवा.

भाजीपाला

वांगी, टोमॅटो, मिरची

१. तयार फळांची काढणी करा
२. फळ आणि शेंडा पोखरणाऱ्या अळयांपासून उपद्रव झाल्यास अळीयुक्त शेंडे आणि फळे नष्ट करा. सायपरमेथ्रिन २५ टक्के १५० मिली. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के १०००मिली. ५०० लि. पाण्यातून प्रती हेक्टरी फवारावे. तसेच मावा, तुडतुडे, खोडकिडींचा उपद्रव दिसून आल्यास कार्बोफयुरॉन ३ टक्के दाणेदार १६.५ किलो प्रती हेक्टरी जमिनीत पुरेसा ओलावा असताना मिसळावे.
३. टोमॅटोच्या पानावर अथवा फळांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मेन्कोझेब १२५० ग्रॅम किंवा झायनेब १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
४. कुजलेली फळे व इतर काडीकचरा कंपोस्ट खडडयात टाका.

भेंडी

१. भेंडी पिकास दर चार दिवसांनी पाणी द्या.
२. पाण्याची पुरेशी तरतूद असल्यास भेंडी पिकाची फेर लागवड करा.
३. भेंडीवर फळ पोखरणाऱ्या अळीचा उपद्रव दिसून आल्यास किडग्रस्त भेंडे आणि फळे नष्ट करा.
४. भेंडीवरील फळे पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी २५ टक्के प्रवाही सायपरमेथ्रीन २०० मिली किंवा २० टक्के प्रवाही फेन्वेलॅरेट २५० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करा. तुडतुडे, मावा, पांढरी माशी, या किडींचा प्रादुर्भाव आढळल्यास ३० टक्के प्रवाही डायमेथोएट, ५०० मिली. अथवा १७.८ इ.सी. इमीडाक्लोप्रीड १०० मिली. ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

उन्हाळी भाज्यात कारली, दोडकी, भोपळे व वेलभाज्या घेतल्या असल्यास

१. नियमितपणे तिसऱ्या दिवशी पाणी द्या.
२. तांबडे भुंगे, काळे भुंगे, फळमाशी या किडीपासून या पिकांचे संरक्षण करा. उपद्रव मोठया प्रमाणात असल्यास १० मिली. डीडीव्हीपी प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करा.
३. फळमाशीचा उपद्रव कमी करण्यासाठी डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ‘रक्षक’ सापळयाचा वापर करा.

पशुसंवर्धन

१. मका व इतर वैरणीची पिके फुलोऱ्यावर आली असल्यास (पेरणीपासून ६५ ते ७० दिवसांनी) या पिकाची कापणी करा.
२. युरिया प्रक्रियेद्वारा आली असल्यास (पेरणी ६५ ते ७० दिवसांनी) या पिकाची कापणी करा.
३. गोचिडांचे नियंत्रणासाठी गुरांचे अंगास केसांचे उलट दिशेने २ टक्के मिथील पॅरेथिऑनची भुकटी अंगास चोळा.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश, (जिल्हा – सिंधुदुर्ग/रत्नागिरी)

( कालावधी – एप्रिल – मे )

एप्रिल दुसरा पंधरवडा

भात : उन्हाळी भात

१. भात कापणी ''वैभव'' विळयाचा वापर करुन जमिनीलगत करावी.
२. कापणी केलेले भात ३ ते ४ दिवस चांगले वाळू द्या.
३. भाताच्या मळणीसाठी मळणी यंत्राचा वापर करा.
४. बियाण्याच्या भाताची साठवण वेगळी करा.
५. भात कापणीनंतर खाचरांत योग्य वापसा असताना नांगरट करा.
६. धस्कटे व इतर काडीकचरा गोळा करुन जाळून टाका अथवा त्यापासून गांडूळखत किंवा कंपोस्ट खत तयार करा.

कडधान्ये

१. कडधान्याची मळणी राहीली असल्यास पूर्ण करा.
२. कडधान्य चांगले वाळल्यानंतर तेलाची प्रक्रिया (१० मिली मोहरी प्रति किलो बियाणे) करुन साठवण करा.
३. बियाण्याचे कडधान्य काळजीपूर्वक वेगळे ठेवा.

भुईमुग

१. भुईमुगाची काढणी करा.
२. शेंगा चांगल्या वाळू द्या.
३. बियाण्यासाठी टपोऱ्या चांगल्या शेंगाची निवड करा.
४. शेंगा चांगल्या वाळल्यानंतर प्लॅस्टीक पिशवीत (५०० ते ६०० गेज) भरुन त्यात चुनखडीचे खडे टाकून पिशवीचे तोंड चांगले बंद करा. अशा तऱ्हेने शेंगाची साठवण केल्यास त्यापुढील हंगामाच्या पेरणीसाठी वापरता येतात.

फलोद्यान

नवीन आंबा लागवड

१. लागवडीच्या वर्षी आठवडयातून दोन वेळा, दुसऱ्यावर्षी आठवडयातून एक वेळा तर तिसऱ्या वर्षी आठवडयातून एकदा प्रति पाळीस प्रति कलमास २० लिटर पाणी ठिबक पध्दतीने द्यावे.
२. कलमांभोवती उगवलेले गवत आणि जोडाखालील खुंटावरील फुट काढून टाका.
३. नवीन कलमांचे मोकाट जनावरांपासून संरक्षण करा.
४. वणव्यामुळे नवीन कलमांचे नुकसान होऊ नये म्हणून योग्य काळजी घ्या.
५. पुढील वर्षी कलम लागवड करण्यासाठी १० मीटर X १० मीटर अंतरावर १ मीटर X मीटर X १ मीटर आकाराचे खडडे तयार करा. ते उन्हात चांगले तापू द्या. एक हेक्टर क्षेत्रात १०० खडडे बसतात.

जुनी लागवड

१. १४ आणे तयार आंबा फळांची देठासह सकाळी १० पर्यन्त व सायंकाळी ४.०० नंतर काढणी करा. त्यासाठी 'नूतन' झेला वापरा.
२. आंबे काढल्यानंतर सावलीत गोणपाट किंवा चटईवर ठेवा. तसेच वाहतुक करताना फळे झाकून न्यावीत. त्यामुळे हापूस आंबे पिकल्यावर त्यात साका होण्याचे प्रमाण कमी होते.
३. फळमाशीच्या नियंत्रणासाठी ''रक्षक'' या फळमाशीच्या सापळयाचा वापर करा.
४. आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी फळे ५२° से. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे ठेवून नंतर सावलीत वाळवावीत आणि नंतर पिकण्यासाठी खोक्यात भरावीत. उष्णोदकाची प्रक्रीया करताना पाण्याचे तापमान ५२° से. स्थिर राहील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. कोणत्याही परिस्थितीत तापमान ५२° से. पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

काजू

१. पडलेल्या तसेच तयार फळाच्या काजू बिया गोळा करा. शक्य असल्यास वाया जाणाऱ्या काजू बोंडूपासून काजू सिरप तयार करा.
२. बिया वाळवण्यापूर्वी देठाजवळील फळाचे अंश राहीलेला भाग विळयाने काढून घ्या व मग बीया वाळवा.
३. खरीप हंगामात किती क्षेत्रात कलमे लावणे शक्य होईल याचा अंदाज घ्या व नवीन कलमे लावावयाच्या क्षेत्रात ७ X ७ मीटर ते ८ X ८ मीटर अंतरावर ६० सेमी या आकाराचे खडडे समांतर रेषेवर तयार करा. एका हेक्टर क्षेत्रात असे अनुक्रमे २०४ ते १५५ खडडे तयार करता येतील.
४. हे खडडे उन्हात चांगले तापू द्या.

कोकम

१. पक्व कोकमाची काढणी करा.
२. कोकम सालापासून अमृत कोकम तयार करा किंवा कोकमसाल वाळवून आमसूल तयार करा. फळातील बिया धुवून चांगल्या वाळवा.
३. शक्य असेल तर कोकम बियांपासून मुटेल (कोकम तेल केक) तयार करा.

नारळ, सुपारी

१. बागेची स्वच्छता ठेवा.
२. दर चार दिवसांनी नियमितपणे पाणी द्या.
३. तयार नारळांची, सुपारी घडाची काढणी करा आणि सुपारी फळांची प्रक्रिया करुन वाळवणी करा.

केळी

१. जमिनीच्या मगदुराप्रमाणे व पाण्याची उपलब्धता लक्षात घेवून ३ ते ४ दिवसांनी बागेस पाणी द्या.
२. सिगॅटोका रोगाचा पानांवर प्रादुर्भाव दिसून आल्यास एक लिटर पाण्यात अडीच ग्रॅम डायथेन एम—४५ किंवा २.५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड किंवा १ ग्रॅम कार्बेडेझीम किंवा १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा. फवारणीच्या औषधात १ मिली सिटकर टाका.
३. पर्णगुच्छ रोगाची रोपे/झाडे बागेत आढळून आल्यास अशी रोपे/झाडे समूळ काढून नष्ट करा. शक्यतो आजूबाजूच्या बागातून एकाच वेळी अशा रोगट झाडाचे निर्मूलन करावे.

काळीमिरी

१. काळीमिरीच्या वेलाच्या बुंध्याकडील फुटव्यापासून निघालेल्या वेलाचा छाट कलमांसाठी वापर करा. त्यासाठी काडया कमीत कमी दोन पेरांच्या ठेवा. तसेच पाने काढून टाकावीत. एक पेर जमिनीत लावा व काडया उलटया लागणार नाहीत, याची काळजी घ्या.
२. रोपांस व रोपवाटिकेत नियमित पाणी द्या व ५० टक्के सावली राखा.
३. जायफळ सालीपासून सालीचे पावडर किंवा कॅण्डी बनवा.

जायफळ

१. जायफळ तयार झाल्यावर बी व जायपत्री वेगळी करुन उन्हात वाळवा.

मे पहिला पंधरवडा

भात

१. उन्हाळी भाताची कापणी राहिली असल्यास ती जमिनीलगत करा त्यासाठी वैभव विळयाचा वापर करा.
२. शेतात पसरलेले भात ३ ते ४ दिवस चांगले वाळू द्या.
३. शक्यतो लवकर मळणी करा. त्यासाठी मळणी यंत्राचा वापर करा.
४. बियाणे भाताची वेगळी मळणी करुन ते भात वेगळे ठेवा. सुधारीत वाणाचे शुध्द भात बियाणे इतर शेतकऱ्यांनाही द्या.

खरीप भाताची पूर्व तयारी

१. जमिनीत वापसा येताच त्वरीत नांगरणी करा.
२. भाताची धसकटे गोळा करुन जाळा अथवा त्यापासून कंपोस्ट/गांडूळ खत तयार करा.
३. बियाणाचे भाताची वेगळी मळणी करुन ते भात वेगळे ठेवा. सुधारीत वाणाचे शुध्द भात बियाणे इतर शेतकऱ्यांनाही द्या.
४. बांधबदिस्ती करुन उंदीर, खेकडयांची बिळे बुजवा.
५. खरीप हंगामासाठी शेणखत/कंपोस्ट/बायोगॅस खत मिळवा
६. खरीप हंगामात घ्यावयाच्या भात पिकासाठी अधिक उत्पन्न देणाऱ्या सुधारित वाणाचे बियाणे मिळवा.
७. भात बियाणास प्रक्रिया करताना

अ) १० लिटर पाण्यात ३०० ग्रॅम मीठ टाकून द्रावण तयार करा. या द्रावणात भाताचे बियाणे बुडेल इतपत टाकावे व बियाणे चांगले ढवळावे. चाळणीच्या सहाय्याने तरंगणारे बियाणे वेगळे करावे. जड व तळाला बसलेले बियाणे वेगळे काढून स्वच्छ पाण्याने ३ ते ४ वेळा धुवून ते ४८ तास सावलीत वाळवावे.

ब) पेरणीपूर्वी एक किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम किंवा कार्बेंडेथिम या पैकी एक बुरशीनाशक चोळून पेरावे.

भात रोपवाटिका

१. चांगल्या पोताची, पाणी न साचणारी जमिन रोपवाटिकेसाठी निवडावी.
२. जमीन नांगरुन ढेकळे फोडून माती भुसभूसीत करावी.
३. एक आर क्षेत्रात १०० किलो शेणखत/कंपोस्ट खत/बायोगॅस खत पसरा व ते मातीत मिसळा.
४. गादी वाफे १ मीटर रुंदीचे १५ ते २० से.मी.उंचीचे उतारानुसार योग्य लांबीचे तयार करा.

खार जमिनीची भाताच्या लागवडीसाठी पूर्व मशागत

१. शेतातील ढेकळांची पहारीने उलकटणी करावी व खाचरा सभोवती ३० से.मी खोल आणि ४५ से. मी.रुंदीचे चर तयार करावेत. याचा उपयोग क्षारांचा निचरा होण्यासाठी होतो.
२. खाचरात दर हेक्टरी १२ ते १५ टन शेणखत/कंपोस्ट खत पसरा.
३. सुधारीत वाणांचे बियाणे मिळवा.

नागली व वरी

१. रोपवाटिकेसाठी पाण्याचा निचरा होणा—या सुयोग्य जागेची निवड करा.
२. रोपवाटिकेसाठी पूर्व तयारी करा.

कडधान्ये

१. निचरा होणाऱ्या क्षेत्राची निवड करा.

गळीत धान्ये (भुईमुग)

१. निचरा चांगला असलेली भुसभुसीत जमीन निवडा.
२. दर हेक्टरी १० टन शेणखत/कंपोस्टची तरतूद करा.
३. या पिकासाठी रासायनिक खतामार्फत आवश्यक असलेल्या दर हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरदाची (बोरोनेटेड सुपर फॉस्फेट) व्यवस्था करा.

ऊस (सिंधुदुर्ग)

१. ऊस पिकाची पक्की बांधणी पूर्ण करा. (यामुळे सरीच्या ठिकाणी वरंबा आणि वरंब्याच्या ठिकाणी सरी तयार होईल.)
२. बांधणीच्या वेळी हेक्टरी १०० किलो नत्र द्या.

आंबा

आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी फळे ५२° से. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे ठेवून नंतर सावलीत वाळवावीत आणि नंतर पिकण्यासाठी खोक्यात भरावीत. उष्णोदकाची प्रक्रीया करताना पाण्याचे तापमान ५२° से. स्थिर राहील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. कोणत्याही परिस्थितीत तापमान ५२° से. पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश

## कालावधी – मे – जून

## मे दुसरा पंधरवडा

भात

१. गादी वाफ्यावर सुधारीत वाणाच्या जातीची धुळ वाफ्यात पेरणी करा.
बियाणांचे प्रमाण – अ) जाड दाण्याच्या जाती–५० कि/हे.
ब) बारीक आणि अतिबारीक दाण्यांच्या जाती–४० कि/हे.
२. गादी वाफ्यावर ७ ते ८ से.मी.अंतरावर ओळीत पेरणी करा. बियाणे चांगले झाकून घ्या.
३. पाण्याची तरतूद असल्यास गादी वाफ्यावर हलकेसे पाणी द्या.
४.पेरलेल्या बियाणांचे पक्षांपासून संरक्षण करा.
५ पेरणीनंतर २ ते ३ दिवसांनी पुरेशी ओली असताना ब्युटाक्लोर तणनाशकांची प्रतिलिटर पाण्यात ६ मि.ली.प्रमाणे मिसळून फवारणी करा.

नागली व वरी

१. भाताप्रमाणे नागली व वरीच्या सुधारीत वाणाचे बियाणे मिळावा.
२. बियाणे गादी वाफ्यावर विरळ पेरा. (हेक्टरी ६ किलो बियाणे)
३. बियाणे चांगले झाकून घ्या व त्याचे पक्षांपासुन संरक्षण करा.

औजारांची निगा व दुरुस्ती

१. औत, फाळ, फळी इत्यादींची आवश्यकता भासल्यास दुरुस्ती करा किंवा नवीन मिळावा.
२. औषध फवारणीचे पंप, धुरळणी यंत्र यांची दुरुस्ती करुन घ्या.
३. पीक वीमा योजनेचा लाभ घेणेसाठी सहकारी सोसायटी सभासद व्हा.

## उद्यानविद्या

आंबा नवीन लागवड

१.कलमांना नियमित पाणी द्या.
२. शेंडे पोखरणाऱ्या अळीपासून नवीन पालवीचे संरक्षण करा. त्यासाठी प्रति १० लिटर पाण्यात १२.५ मिली. ३६ टक्के मोनोक्रोटोफॉस मिसळून फवारणी करा.

जुनी लागवड

१. ८५ टक्के ( १४ आणे ) पक्व आंब्याची देठासह काढणी करा. त्यासाठी ‘‘नूतन’’ झेल्याचा वापर करा. काढलेले आंबे सावलीत ठेवा
२. आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी फळे ५२° से. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे ठेवून नंतर सावलीत वाळवावीत आणि नंतर पिकण्यासाठी खोक्यात भरावीत. उष्णोदकाची प्रक्रीया करताना पाण्याचे तापमान ५२° से. स्थिर राहील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. कोणत्याही परिस्थितीत तापमान ५२° से. पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. बागेमध्ये आंबा वाहतुकीसाठी बांबुच्या टोपल्या वापरल्यास त्यामध्ये कागदाचे आच्छादन द्या.
४. आंबे काढून होताच बांडगुळे व वाळलेल्या फांद्या काढून झाडे स्वच्छ करा. लहान फांद्यावरील बांडगुळ काढण्यासाठी ‘‘अमर’’ बांडगुळ कटरचा वापर करा.
५. मोठया फांद्यांवरील बांडगुळे कोयत्याने काढून त्या भागावर १ टक्का ग्लायफोसेटची फवारणी करावी

.

फलोद्यान पिके लागवडीची पूर्व तयारी

१. लागवडीस निवडलेल्या क्षेत्रातील झुडपे तोडून जमीन स्वच्छ करा.
२. फळझाडांचे प्रकारानुसार सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे योग्य अंतरावर खडडे खोदा.
३. खडडे खोदताना वरच्या १५ से.मी.व खालच्या थराची माती वेगवेगळया दिशेस ठेवा त्यातील दगडगोटे वेचून घ्या.
४. खडडे तयार केल्यावर १५ दिवस उन्हात तसेच तापू द्या.
५. पाऊस सुरु होण्यापूर्वी खडडयात २/३ पर्यन्त माती भरा. १/३ भागात चांगली मातीसह कुजलेले कंपोस्ट/शेणखत मिसळा.
६. वाळवीचा उपद्रव असलेल्या क्षेत्रात खड्डे भरण्यापूर्वी खडडयाचे तळात व सर्व बाजूस १० टक्के कार्बारीलची ५० ग्रॅम भुकटी किंवा २ टक्के मिथेल पॅराथिऑन ५० ग्रॅम टाका.

नारळ व सुपारी

१. बागेत स्वच्छता ठेवा.
२. नियमित पाणी द्या.
३. झावळे गोळा करुन कंपोस्ट किंवा गांडूळखत करा.
४. सुपारीचे कोळे रोगामुळे नुकसान होऊ नये म्हणून रोगट शिंपुटे, गळून पडलेल्या सुपाऱ्या नष्ट करा व झाडावर व पोफळांवर .एक टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा.

( १ किलो चुना . १ किलो मोरचुद. १०० लिटर पाणी) किंवा
१२५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.

पशुसंवर्धन

पावसाळयातील चार महिन्यांसाठी सुक्या वैरणीची व्यवस्था करा.
शेतकामाच्या जनावराची विशेष काळजी घ्या.
जनावरांना विशेषत: गाई म्हशीला अधिक स्वच्छ पाणी मिळेल या बाबींकडे विशेष लक्ष द्या.
पायलाग सारख्या संसर्गजन्य रोगाची लागण झाली असल्यास पशुवैद्याकडून औषध योजना करा.
गोचिडयापासून जनावरांचे संरक्षण करा. त्यासाठी २ टक्के मेथिल पॅरेथिऑन भुकटीचा वापर करा.
कोंबडयांना रानीखेत व इतर रोग होऊ नयेत म्हणून पशुवैद्यकाचे सल्ल्यानुसार उपाय योजना करा.
कोंबडयांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी नेहमीपेक्षा जास्त पाणी द्या व रात्रीचे वेळी पाणी मिळेल याची काळजी घ्या.

## जून पहिला पंधरवडा

भात

१. पेरणीपूर्वी गादीवाफ्यांवर दर चौ.मी. क्षेत्रावर ३ किलो कंपोस्ट खताची भर द्या
२. त्यानंतर दर आर क्षेत्रात २.२ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ०.८ किलो म्युरेट ऑफ पोटॅश खताचा पहिला हप्ता द्या.
३. पावसाची शक्यता लक्षात घेवून वाफ्यावर ७ ते ८ से.मी अंतरावर १ ते २ से.मी खोल बी पेरुन मातीने झाकावे. पेरणीसाठी सुधारीत वाणाचे बियाणे निवडावे.
४. बियाण्याचे प्रमाण
   १. जाड दाण्याच्या जाती दर हेक्टरी ४५ ते ५० किलो.
   २. बारीक दाण्याच्या जाती हेक्टरी ३५ किलो ते ४० किलो.
५. रोपवाटीकेतील तणांचे नियंत्रणासाठी भाताच्या पेरणीनंतर २–३ दिवसांचे आत ब्युटाक्लोर हे तणनाशक ५ लिटर पाण्यात ३० मि.ली याप्रमाणे मिसळून फवारावे. त्यावेळी जमिनीत पुरेसा ओलावा असावा.

६. पावसाळा चालू होताच भात खाचरातील/बांधावरील खेकडयांचा बंदोबस्त करा. त्यासाठी पहिले १५ दिवस रोज बत्तीच्या सहाय्याने रात्री खेकडे गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात न ट करावेत. ही एक मोहिम म्हणून राबवावी. तसेच खेकडयाच्या बिळात वि ारी आमि ाचा वापर करावा.

७. शेतातील भाताचे चोथे गोळा करा.

नागली व वरी

या पिकाची पेरणी ही भाताप्रमाणे करा. बियाणे विरळ पेरा. त्यामुळे रोपे जोमदार होतील.
एक हेक्टर क्षेत्रातील लागवडीसाठी दहा आर क्षेत्रामध्ये गादी वाफ्यावर ६ किलो बियाणांची पेरणी करा.

खोडकिडींचा बंदोबस्त

पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति हेक्टरी फोरेट १० किलो किंवा क्विनॉलफॉस ५ टक्के १५ किलो किंवा कार्बोफयुरॉन ३ टक्के १६.५ किलो मातीत मिसळा. ही औषधे वापरताना शेतात जास्तीत जास्त ओल असावी. ही किटकनाशके वापरल्यावर शेतात पाणी अडवावे. ओल कमी असल्यास पुढीलपैकी एका औषधाची फवारणी करावी.

१. कारटॅप हायक्लोराईड ५० टक्के ६०० ग्रॅम किंवा
२. ट्रायझोफॉस ४० टक्के १३५० मिली

वरीलपैकी कोणतेही एक औषध ५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावरील रोपाटीकेत फवारणी करावी. १० आर क्षेत्रासाठी वरील औषधाचे प्रमाण १/१० करुन ५० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

रोग

रोपावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास वरील फवारणी बरोबर झायनेब २ किलो अथवा कॉपर ऑक्सीक्लोराईड १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फळबाग लागवड

निरनिराळया फळझाडाना फलोद्यान लागवडीसाठी निवडलेल्या जमिनीत झाडे झुडपे तोडून झाडाच्या प्रकारानुसार खालील तक्त्यात निर्देशित केलयाप्रमाणे वेगवेगळया आकराचे आणि वेगवेगळया अंतरावर खडडे खोदावेत.

| अ.क्र. | फळझाडाचे नांव | अंतर | खड्डयाचा आकार | हेक्टरी अंदाजे झाडांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | आंबा | १० मी X १० मी. | १ मी X १ मी X १ मी | १०० |
| २ | काजू | ७ मी X ७ मी | ६० सेमी X ६० सेमी X ६० सेमी | १५६ ते २०४ |
| ३ | कोकम | ६ मी X ६ मी | ६० सेमी X ६० सेमी X ६० सेमी | २७८ |
| ४ | फणस | १० मी. X १० मी | १ मी X १ मी X १मी | १०० |
| | बागायती फळझाडे | | | |
| १ | नारळ | ८ मी. X ८ मी | १ मी X १ मी X १मी | १५६ |
| २ | सुपारी | २.७ मी X २.७ मी | ६० से.मी X ६० से.मी X ६०से.मी | १३७१ |
| ३ | चिकू | १० मी X १० मी | १ मी X १ मी X १मी | १०० |
| ४ | केळी | २.५ मी X २.५ मी | ४५से.मी X ४५ से.मी X ४५से.मी | १६०० |
| ५ | पपई | ३ मी X ३ मी | ४५से.मी X ४५ से.मी X ४५से.मी | ११११ |
| ६ | लेमन सिडलेस | ३ मी X ३ मी | ६० से.मी X ६० से.मी X ६०से.मी | ८३४ |
| मसाल्याची आंतरपिके | | | | |
| ७ | मिरी | २.५ मी X २.५ मी | ४५से.मी X ४५ से.मी X ४५से.मी | १६०० |
| ८ | जायफळ | ५.४ मी X ५.४ मी(सुपारीतील आंतरपीक) | ९०से.मी X ९० से.मी X ९०से.मी | १२३ |

तक्ता

भात पिकाच्या अधिक उत्पन्न देणाऱ्या जाती

| अ.क्र. | जातीचे नांव | तयार होण्यास लागणारे दिवस | हेक्टरी उत्पन्न क्विंटल |
|---|---|---|---|
| १ | कर्जत–१८४ | १०० ते १०५ | ३० ते ३५ |
| २ | रत्ना | १०० ते ११० | ३५ ते ४० |
| ३ | रत्नागिरी–२४ | ११० ते ११५ | ३५ ते ४० |
| ४ | रत्नागिरी–७११ | १२० दिवस | ४० ते ५० |
| ५ | रत्नागिरी–७३ | ९० ते १०० | ३५ ते ४० |
| ६ | पालघर–१ | १२५ ते १३० | ४० ते ४५ |
| ७ | रत्नागिरी–१ | ११० ते ११५ | ३५ ते ४० |
| ८ | जया | १२५ ते १३० | ४५ ते ५० |
| ९ | आय.आर.८ | १३० ते १३५ | ४० ते ४५ क्विंटल |
| १० | आर.पी.४–१४ | १३० ते १३५ | ४५ क्विंटल |
| ११ | कर्जत–१४–७ | १३५ ते १४० | ४५ क्विंटल |
| १२ | मसुरी | १३५ ते १४० | ४० ते ४५ क्विंटल |
| १३ | रत्नागिरी ६८ | १४० ते १४५ | ४५ ते ५० क्विंटल |
| १४ | जगन्नाथ | १४५ ते १५० | ४५ क्विंटल |
| १५ | पंकज | १४५ ते १५० | ४५ क्विंटल |

| अ.क्र. | जातीचे नांव | तयार होण्यास लागणारे दिवस | हेक्टरी उत्पन्न क्विंटल |
|---|---|---|---|
| १६ | रत्नागिरी–२ | १४५ ते १५० | ४५ क्विंटल |
| १७ | कर्जत–१ | ११० ते ११५ | ३५ ते ४० क्विंटल |
| १८ | कर्जत–२ | १४० ते १४२ | ४० ते ४५ क्विंटल |
| १९ | कर्जत–३ | ११० ते ११५ | ४५ ते ५० क्विंटल |
| २० | फोंडाघाट–१ | ११५ ते १२० | ४५ ते ५० क्विंटल |
| २१ | सहयाद्री (संकरीत भात) | १२५ ते १३० | ६५ ते ७० क्विंटल |
| २२ | सहयाद्री २ | ११५ ते १२० | ४५ ते ५० क्विंटल |
| २३ | सहयाद्री–३ | १२५ ते १३० | ६५ ते ७० क्विंटल |
| २४ | सहयाद्री–४ | ११० ते १२० | ६० ते ६५ क्विंटल |

खार जमिनीसाठी भात जाती

| अ.क्र. | भाताचे वाण | कालावधी(दिवस) | उत्पन्न (क्विंटल) |
|---|---|---|---|
| १ | एल.के.४७–२२ | १२० ते१२५ | २८ ते ३० |
| २ | एस.आर. ३–९ | १४०ते१४५ | २० ते२१ |
| ३ | दामोदर | १३५ते१४० | २८ ते ३० |
| ४ | पनवेल–१ | १२५ ते १३० | ३५ ते ४० |
| ५ | पनवेल –२ | ११० ते ११५ | ४०ते ४५ |
| ६ | नागली | | |
| | दापोली–१ | १२५ ते १३५ | १० ते १५ |
| | जी–११ | १२५ दिवस | ८ ते १० |

कडधान्ये सुधारीत बियाणे

| अ.क्र. | पिकाचे नांव | सुधारीत बियाणे | लागणारे दिवस | प्रति हेक्टरी बियाणे कि. | हेक्टरी उत्पन्न (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|
| १ | तूर | कोकण तूर–१ | १३० ते १३५ | १२ ते १५ | ९–१० |
| | | टी–२१ | १५० ते १६० | १२ ते १५ | १२–१३ |
| २ | उडीद | सिंदखेडा | ८० ते ८५ | १५ ते २० कि. | ६–८ |
| | | टाईप–९ | ७५ ते ८० | १५ ते २० कि. | ६–८ |
| ३. | चवळी | कोकण सदाबहार | ५० ते ५५ | २५ किलो | १३–१४ |
| | | कोकण चवळी सफेद | ६५ ते ७० | २५ किलो | ९ –१० |
| ४ | वाल | कोकण वाल–१ | १०० | ५० किले | ७–८ |
| | | कोकण वाल–२ | १०५ ते ११० | ५० किलो | ९–१० |

गळीत धान्याचे सुधारीत बियाणे

| अ.क्र. | पिकाचे नांव | सुधारीत बियाणे | लागणारे दिवस | प्रति हेक्टरी बियाणे कि. | हेक्टरी उत्पन्न (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भुईमुग | कोकण गौरव | १०५ (खरीप)<br>१२५ (रब्बी) | १०० कि.शेंगदाणे | १८–२०<br>२०–२२ |
| | | ट्रॉम्बे कोकण टपोरा | १२० | १०० कि.शेंगदाणे | २०–२२ |
| | | कोपरगांव | ११० ते १२० | १०० कि.शेंगदाणे | १०–१५ |
| | | एस.बी.११ | १२० ते १२५ | १०० कि.शेंगदाणे | १५–२० |
| | | एम–१३ | १३५ ते १४० | १०० कि.शेंगदाणे | २५–३० |
| २ | कारळा | एन १–२–३ | ११० | ६ ते ७ किलो | २०–२२ |
| | | इगतपुरी–७६ | ११० | ६ ते ७ किलो | २०–२२ |
| ३ | तीळ | फुले नं.१ | ११५ | ५ किलो | |

गोडया पाण्यात मत्स्य संवर्धन:– तलावातील मत्स्य उत्पादन पूर्ण झाले असल्यास तलावाची पूर्व मशागत करुन पुढील पिकासाठी तलाव पूर्णत: तयार ठेवा.

निमखारे पाण्यातील मत्स्य संवर्धन

अ) संवर्धन तलावातील कोळंबी विक्रीयोग्य झाली असल्यास त्याची काढणी करा.

ब) तलावातील उत्पन्न काढले असल्यास तलावाची पूर्व मशागत करा.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश,

## (जिल्हा – सिंधुदुर्ग/रत्नागिरी)

## कालावधी – जून – जुलै

..................................................................................................................................

### जून (दुसरा पंधरवडा)

भात

१. रोपे १५ दिवसाची झाल्यानंतर बेणणी करुन नत्र खताचा दुसरा हप्ता १ किलो युरीया प्रति आर या प्रमाणात द्या.

२. रोपवाटीकेवर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास प्रति गुंठा क्षेत्रास १०० ग्रॅम फोरेट किंवा १६५ कार्बोफयुरॉन किंवा १५० क्विनॉलफॉस द्या.

३..कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे लावणी करण्यास उशिर झाल्यास वरीलप्रमाणे नत्र खताची तिसरी मात्रा २५ दिवसांनी द्या.

४. रोपे सहाव्या पानावर आली असता( २१ ते २५ दिवस ) लावणीचे तयारीस लागा.

५. लावणीपूर्वी चिखलणी उत्तम होईल याबाबींकडे लक्ष द्या.

६. चिखलणीचेवेळी खतांची मात्रा खालीलप्रमाणे द्या.

अ) दर हेक्टरी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश या खतांची मात्रा द्या.

*किंवा*

ब) ५० किलो नत्र खताची मात्रा चिखलणीच्यावेळी नांगराच्या तासात एकाच हप्त्यात द्या. पुढे नत्र खत देण्याची गरज भासत नाही तसेच वरीलप्रमाणे स्फुरद व पालाश खतांची मात्रा चिखलणीच्यावेळी द्यावी.

*किंवा*

क) कोणतीही रासायनिक खते न देता चिखलणीच्यावेळी १० टन गिरीपुष्पाचा पाला जमिनीत गाडावा. किंवा ८ टन गिरीपुष्पाचा पाला + ५० कि. नत्र / हेक्टर जमिनीत गाडावे. त्यामुळे अनुक्रमे प्रति हेक्टरी १००, व ५० किलो नत्राची बचत होते.

१. शक्यतो लावणी ओळीत करा. गरव्या व निमगरव्या भात जातीसाठी रोपे २०ग १५ सें.मी. अंतरावर लावल्यास दर चौरस मिटर क्षेत्रात ३३ चुड राहतील तसेच हळव्या जातींची १५ ग १५ से.मी. अंतरावर लावणी करा. याची दर चौरस मीटर क्षेत्रावर ४४ चुड बसतात.

२. लावणीचेवेळी एका चुडात तीनच रोपे लावा. ही रोपे उभी, सरळ २.५ ते ३ से.मी. खोल लावा. अधिक वयाची रोपे लावताना चुडातील रोपांची संख्या वाढवून(५ ते ६ रोपे) लावणी कमी अंतरावर( १५ ग १५ से.मी.) करा.

३. रोपे कमी पडल्यास इतर रोपवाटीकेतून उपलब्ध रोपे मिळवा अथवा रहू पध्दतीने उर्वरीत क्षेत्रात भात लागवड वेळीच पूर्ण करा. रहूसाठी ८० ते १०० किलो बियाणे वापरा.

४. वाहून गेलेल्या अथवा कुजुन गेलेल्या चुडांचे जागी इतर चुडातील वाढीव रोपे काढून लावावीत.

५. खेकडयांचा बंदोबस्त करा. त्यासाठी १ किलो शिजविलेल्या भातात ॲसिफेट ७० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ७५ ग्रॅम किंवा कार्बारील५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी १०० ग्रॅम मिसळून त्याच्या सुपारीच्या आकाराच्या १०० गोळया तयार करा.सायंकाळी एक–एक गोळी बांधावरील बिळात टाकू बिळे बंद करा.

६. हळव्या भात जातींची रोपे २१ दिवसांची झाली असल्यास त्यांची पुर्नलावणी करा.

नागली व वरी

१. भात रोपाप्रमाणे नागली व वरी या रोपांची काळजी घ्या.

२. रोपे ४ ते ५ आठवडयांची झाली असता लावणीची तयारी करा.

३.. लावणी ठोंबा पध्दतीने करा.

४. ठोंब्याच्या छिद्रात लावणीचे वेळी प्रति हेक्टरी ४०किलो नत्र.४० किलो स्फुरद खताची मात्रा द्या.

५. दोन रोपांत १५ सें.मी व दोन ओळीत २० सें.मी. अंतर राहील अशा तऱ्हेने रोंपाची लावणी करा. या अंतरावर रोपे लावल्यास एक चौरस मीटर क्षेत्रात ३३ रोपे राहतील

६. रोपे उभी व उथळ लावा. एका ठिकाणी दोन रोपे लावा.

कडधान्य – उडीद

१. जमीनची नांगरणी करा.

२. पेरणीचे वेळी रासायनिक खतांची हेक्टरी २५ किलो नत्र. ५० किलो स्फुरदाची मात्रा बियाणांचे ओळी शेजारी ५ सें.मी. खोलीवर द्या.

३. पेरणी ओळीत करा. दोन ओळीत ३० से.मी. अंतर ठेवा. पेरणीसाठी पुढीलपैकी एका जातीची निवड करा.

अ. उडीद क्रमांक ५५ (८५ ते ९० दिवस)

ब. सिंदखेडा १–१ (८५ ते ९० दिवस)

क. टी–९ (६४ ते ७० दिवस)

जातीनुसार दर हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरा.

४. आधी पेरणी झाली असल्यास व मावा, पाने खाणारी अळी आढळल्यास फेन्थोएट ५० टक्के ८०० मिली. ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरी फवारावे.

गळीतधान्ये – १) कारळा

१. हलक्या नांगराने जमिनीची नांगरट करा.

२. पेरणीचे वेळी दर हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद मातीत मिसळून घ्या. शक्यतो खत बियाणाचे शेजारी ५ सें.मी. खोलीवर द्यावे.

३. पेरणीसाठी इगतपुरी–७६ (सहयाद्री) अगर एन १–२–३ या जातीचे बियाणे वापरा. हेक्टरी ६ किलो बियाणे पुरेसे आहे.

४. पेरणी ओळीत करा. दोन ओळीत ३० से.मी. अंतर ठेवा.

५. लवकर पेरणी झालेल्या पिकातील तण काढून शेत स्वच्छ ठेवा.

६. पावसाचे जादा पाणी साठणार नाही याची काळजी घ्या.

२) भुईमूग

१. भुईमूग क्षेत्रातील शेवटच्या नांगरटीचेपूर्वी दर हेक्टरी १० ते १५ गाडया शेणखत / कंपोस्ट खत / बायोगॅस खत सर्व क्षेत्रात सारखे पसरा व नंतर शेवटी नांगरट पूर्ण करा.

२. पेरणीचे वेळी दर हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद (बोरोनेटेड सुपर फॉस्फेट) बियाणाचे ओळीखाली किंवा शेजारी पडेल असे द्या. तथापि बियाणांशी खताचा संपर्क येवू नये.

३.पेरणीसाठी कोकण गौरव , कोकण ट्रॉम्बे टपोरा, टॅग २४, टीजी–२६, अगर एस.बी. ११ यापैकी एका भुईमूग जातीची निवड करा. तसेच दर हेक्टरी १०० ते ११० किलो शेंगदाणे या प्रमाणात बियाणे वापरा.

४. पेरणी पूर्वी ५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून त्यानंतर रायझोबियम जिवाणू संवर्धनाची २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे प्रक्रिया करावी.

५. पेरणी टोकण पध्दतीने करुन दोन ओळीत ३० से.मी. व दोन रोपांमध्ये १५ से.मी. अंतर ठेवा.

६. लवकर पेरणी झालेल्या शेतातील तण काढून स्वच्छ ठेवा.

## उद्यानविद्या

### आंबा

नवीन कलमांची लागवड

१. पाणी साचणार नाही अशा खड्डे घेतलेल्या क्षेत्रात नवीन कलमांची लागवड करा.
२. वाळवीचा प्रार्दुभाव होवू नये म्हणून प्रत्येक खड्डयात १०० ग्रॅम फॉलीडॉल २ टक्के किंवा कार्बारील १० टक्के पावडर टाका. बागेतील अथवा बागेजवळची वारुळे नष्ट करा.
३. खड्डा भरतेवेळी ३/४ खड्डा माती व कंपोस्ट + २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरुन घ्यावा.
४. कलम लावताना प्लॅस्टीकची पिशवी काढून हुंडी न फोडता कलम हुंडीसह लावा. तसेच . कलमाचा जोड मातीत गाडला जाणार नाही याची काळजी घ्या. बुंद्याजवळची माती घट्ट बसवा. कलमांजवळ पाणी साचणार नाही याची काळजी घ्या.
५. कलमाच्या जोडावरची पट्टी, सुतळ काढून घ्या. तसेच जोड मोकळा राहील या बाबींकडे लक्ष द्या.
६. कलमांना काठीचा आधार द्या.
७. जुन्या बागांतील बांडगुळे काढून टाका व काडीकचरा गोळा करुन बाग स्वच्छ ठेवा.
८. कलमे एकाच जातीची न लावता परपरागीकरण आणि फळधारणेसाठी १० ते २० टक्के कलमे इतर जातीची लावा.

### काजू

१. शक्यतो उपलब्धतेनुसार काजूच्या सुधारीत जातीची कलमे लावा.
२. माती + कंपोस्ट + रासायनिक खत (१ किलो हाडाची पूड अथवा सिंगल सुपर फॉस्फेट) यांचे मिश्रणाने उन्हाळयात तयार केलेला खडडा ३/४ पर्यंत भरुन घ्या. नंतर कलमे लावा.
३. कलमे प्लॅस्टीक पिशवीत असल्यास प्लॅस्टीक पिशवी काढून घ्या व हुंडी न फोडता हुंडीसह कलमे लावा.
४. कलम लावताना अगर लावल्यानंतर जोडाखालून खुंटातून येणारे धुमारे नियमित काढा व कलमांच्या फांदीचीच वाढ होईल या बाबींकडे लक्ष द्या.

### नारळ व सुपारी

१. नारळ व सुपारी बाग स्वच्छ ठेवा.
२. झावळया व काडी कचरा गोळा करुन कंपोस्ट/गांडूळखत करा.
३. सुपारीवर कोळे रोग होवू नये म्हणून एक टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा.

### मिरी

१. जुन्या वेलींवर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा.
२. पाण्याचा निचरा होण्यासाठी चर खणा.
३. वाढत्या वेलींना झाडावर चढण्यासाठी आधार द्या.

### भाजीपाला

१. वेलभाज्या उदा. पडवळ, कारली, दुधी, शिराळी, काकडी इ. वेलभाज्यांची लागवड करा. त्यासाठी सुधारीत जातींचे बियाणे वापरा.
२. लवकर लागवड केलेल्या भाज्यांचे वेल मंडपावर चढवा तसेच त्यांना आधार द्या.
३. उत्तम निच–याच्या शेतात भेंडीची लागवड करा. त्यासाठी परभणी क्रांती अर्का अनामिका, वर्षा उपहार या सारख्या विषाणू रोगास प्रतिकारक जातीचे बियाणे वापरा.
४. उत्तम निच–याच्या जागेत वांगी, मिरची रोपांची लागवड करा. लागवडीचेवेळी दर हेक्टरी ५० किलो नत्र व ७५ किलो स्फुरदाची मात्रा द्या.
५. वांगी व मिरचीच्या विद्यापीठाने शिफारस केलेल्या जातींची लागवड करा.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय

पिसाळलेल्या मोकाट कुत्र्यांपासून आपल्या जनावरांचे रक्षण करावे. पाळीव कुत्र्याचे रेबीज रोगापासून संरक्षण करावे.

## जुलै पहिला पंधरवडा

भात

१. उत्तम चिखलणी करुन भाताची लावणी करा.
२. निमगरव्या व गरव्या भाताची लावणी पूर्ण करा. लावणी ओळीत करा.
३. रोपे सरळ उभी व उथळ लावावीत.
४. खतांची मात्रा वरीलप्रमाणे द्या.

अवर्षण परिस्थितीत

१. भाताची १५ X १५ से.मी. अंतरावर लावणी करा.
२. जास्त कालावधीची रोपे झाली असल्यास प्रत्येक चुडात ५ ते ६ रोपे लावा.
३. नत्र खताची मात्रा (१२० किलो) वाढवून द्या.

नागली /वरी

१. रोपवाटीकेतील तणांची बेणणी करा.
२. लावणीची पूर्व तयारी करा.
३. रोपवाटीकेतील पाण्याचा निचरा करा.
४. क्षेत्रामध्ये उतारास आडवी पूर्व मशागत करा.
५. करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी एक लिटर पाण्यात २.५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड किंवा ४ ग्रॅम झायनेब मिसळून फवारणी करा.
६. रोपांची लावणी २० X १५ से.मी. अंतरावर करा.

उडीद व मूग

१. पेरणी केली नसल्यास पेरणी पूर्ण करा.
२. पिकात साचलेल्या पाण्याचा निचरा करा.

तेलबिया (भुईमूग)

१. पेरणी पूर्ण करा.
२. भुईमूगाच्या शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्या

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश

## कालावधी– जुलै –ऑगस्ट

### रत्नागिरी / सिंधुदुर्ग

### जुलै दुसरा पंधरवडा

हळवे भात/पेरभात

१. बेणणी करा
२. नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ५० किलो द्या.
३. खोडकीडीचा हमखास प्रादुर्भाव होणाऱ्या क्षेत्रात या कीडीच्या प्रादुर्भावाकडे बारकाईने लक्ष द्या. दर चौरस मीटर क्षेत्रात १ अंडीपुंज आढळून आल्यास किंवा ५ टक्के खोडकीडीग्रस्त फुटवे दिसून आल्यास प्रती हेक्टरी क्विनॉलफॉस १५ किलो किंवा कार्बोफ्युरॉन १६.५ किलो यापैकी कोणतेही एक किटकनाशक जमिनीत पुरेसा ओलावा असताना वापरावे. हातास जखमा असलेल्या व्यक्तीनी सदर किटकनाशके हाताळू नयेत. दाणेदार कीटकनाशके उपलब्ध नसल्यास प्रवाही कीटकनाशकाची फवारणी करा. त्यासाठी हेक्टरी ५०० लिटर पाण्यात १३५० मिलीट्रायझोफॉस किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ६०० ग्रॅम यापैकी एका कीटनाशकाची फवारणी करावी.
४. पावसाचा खंड अधिक काळ असल्यास भात पिकास पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्याने ओढयाचे/नाल्याचे पाणी अडवून शक्य असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी.

नागली

१. लावणी उताराच्या आडव्या दिशेने करा.
२. रोपे ३० ते ३५ दिवसांची असावीत.
३. लावणी ओळीत करा. ठोंबा पध्दतीने लावणी केल्यास दोन रोपांमध्ये १५ से.मी. व दोन ओळीत २० से. मी. अंतर ठेवा.
४. एके ठिकाणी दोन रोपे उभी व उथळ लावा.
५. रोप लावण्यापुर्वी ठोंब्याच्या छिद्रात नत्र व स्फुरदाची मात्रा दया.
६. दर हेक्टरी ४० किलो नत्र व ४० किलो स्फुरदाची मात्रा दया.
७. पाऊस कमी असताना लावणी करा.

उडीद / मूग

या पिकावर मावा, पाने खाणारी अळी या कीडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५०० लिटर पाण्यातून फेन्थोएट ५० टक्के ८०० मिली प्रती हेक्टरी फवारावे. साचलेल्या पाण्याचा निचरा करा.

भुईमूग

१. पीक ३० ते ३५ दिवसांचे होताच भर दया.
२. मावा, तुडतुडे या कीडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास त्यांचे नियंत्रण करा.
३. पाणी साचू नये म्हणून काळजी घ्या.
४. शेंडेमर रोगाने बाधित झाडे उपटून त्यांचा नाश करावा.

### ऑगस्ट पहिला पंधरवडा

भात

१. भात पिकातील तणांची बेणणी करा.
२. निमगरव्या भात जातीस लावणीपासून ३० ते ४० दिवसांनी नत्र खताचा दुसरा हप्ता ४० किलो / हेक्टर द्या. नत्र खत देण्यापूर्वी पाण्याचा निचरा करा व खत दिल्यानंतर पाणी खाचरातून जाणार नाही याची काळजी घ्या.
३. जपानी किंवा कर्जत कोळप्याने कोळपणी करा.
४. खते देण्यापूर्वी तणांचे नियंत्रण करा.
५. भात खाचरामध्ये पाणी पुरवठा व निचरा या बाबींकडे लक्ष दया.

कारळा

१. पिकातील तण काढा
२. नत्राचा दुसरा हप्ता दयावयाचा राहीला असल्यास दर हेक्टरी १२.५ किलो या प्रमाणात द्या.

भुईमूग

१. तणांचा बंदोबस्त करा.
२. पिकात पाणी साचणार नाही याची काळजी घ्या.
३. मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के १२५ मिली ५०० लि. पाण्यातून फवारावे. किंवा मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी २५ किलो प्रती हेक्टरी धुरळावी.

ऊस

ऊसाचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होईल या बाबींकडे लक्ष द्या.

## उद्यानविद्या

आंबा

१. नवीन कलमांना काठीचा आधार द्या.
२. बुंदयाजवळील साचलेल्या पाण्याचा निचरा करा.
३. नवीन कलमांचा जोड मोकळा राहील यासाठी जोडावरील प्लॅस्टीकची पटटी काढून घ्या.
४. नर्सरीतील आंबा कलमांना पिशवीत १०० मि.ली. बुरशीनाशक कार्बेडेझीम २ ग्रॅम प्रति एक लिटर या प्रमाणात द्या.
५. नियमीत फलधारणेसाठी आंबा झाडाच्या विस्तारानुसार कल्टारचा वापर करा. प्रति मीटर झाडाच्या व्यासास ०.७५ ग्रॅम क्रियाशील घटक पॅक्लोब्युट्रोझॉल ३ ते ६ लिटर पाण्यात मिसळून जमिनीतून द्यावे.

नारळ व सुपारी

१. पाण्याचा निचरा होण्यासाठी बागेभोवती आणि नारळ सुपारीच्या रांगामधून योग्य अंतरावर चर काढून पाण्याचा निचरा करा.
२. सुपारीची गळ थांबविण्यासाठी पाऊस कमी असताना १ टक्का बोर्डोमिश्रण फवारा. या मिश्रणात १० लिटर द्रावणात १० मि.ली. सॅडोविट मिसळा.
३. पावसाचा खंड अधिक काळ १२ ते १५ दिवस असल्यास पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्याने सुपारीची फळे तडकून गळण्याची शक्यता असते. अशा वेळेस पाण्याचा ताण पडू देऊ नये. शक्य असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी.

काजू

१. कलमांना आधार द्या.
२. कलमांच्या जोडाखालची फूट वेळीच काढून टाका.

मसाल्याची पिके

१. नवीन मिरी लावण्यासाठी लावलेल्या पांगाऱ्याची छाटणी करा.
२. पूर्वी लावलेल्या मिरी वेलावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा.
३. बागेत पाणी साचू देवू नका.

भाजीपाला

१. पडवळ, कारळी, दुधी, काकडी इत्यादी वेलभाज्यांना पावसाची उघडीप पाहून नत्राचा दुसरा हप्ता एका गुंठयात २०० ते ३०० गॅम नत्र या प्रमाणात द्या.
२. वेलभाज्यांना आधारासाठी मांडवाची व्यवस्था करा.
३. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डिनोकॅप १ मि.ली. किंवा हेक्साकोनॅझोल ०.५ मि.ली. प्रति एक लिटर पाण्यात मिसळून फवारावे. तसेच केवडा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब अडीच ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रोग दिसून येताच १५ दिवसांच्या अंतराने वरील औषधांच्या तीन फवारण्या फळे काढण्यापूर्वी दहा दिवस अगोदर कराव्यात.

४. लाल भुंगेरे, फळमाशी, मावा इत्यादी किडींपासून वेलांचे संरक्षण करा. त्यासाठी १० मिली डायक्लोरव्हॉस १० लिटर पाण्यातून फवारावे. फळमाशी नियंत्रणासाठी रक्षक सापळयाचा प्राधान्याने वापर करा.

वांगी, मिरची

१. बेणणी करा.
२. पाण्याचा निचरा करा.
३. नत्र खतांचा दुसरा हप्ता द्या (५० कि. नत्र प्रति हेक्टर)
४. कीड रोगांपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाय योजना करा.

सामाजिक वनिकरण

१. नवीन रोपांची लागवड करा.
२. जुन्या लागवडीस मातीची भर द्या.

पशुसंवर्धन

१. जनावरांच्या पोटदुखी व जुलाब यावर प्रतिबंधक उपाय करावेत.
२. जंताची बाधा टाळण्यासाठी पशुवैद्यकाचा सल्ला घ्या.
३. हिरव्या चाऱ्यासाठी झुडुपवर्गीय वैरणीच्या चाऱ्याची लागवड करा.

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश

कालावधी – ऑगस्ट – सप्टेंबर

रत्नागिरी / सिंधुदुर्ग

ऑगस्ट दुसरा पंधरवडा

### भात

खोडकिडा

१. या किडीचा उपद्रव दिसून आल्यास पुढील उपाय योजावेत. १० टक्के दाणेदार फोरेट प्रति हेक्टरी १० किलो किंवा ५ टक्के क्विनॉलफॉस प्रति हेक्टरी १५ किलो किंवा ३ टक्के कार्बाफयुरॉन प्रति हेक्टरी १६.५ किलो या प्रमाणात या औषधाचा वापर करावा. या औषधाचा वापर शेतात ५ टक्के रोप किडग्रस्त असतील किंवा एक चौरस मीटर क्षेत्रात किडींचा एक अंडीपुंज आढळला तरच करावा. यापेक्षा किडींचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात असेल तर वरील औषधांचा वापर आर्थिकदृष्टया फायदेशीर ठरत नाही. दाणेदार औषधांचा वापर करताना खाचरात पाणी साठवून ठेवणे आवश्यक आहे.

२. पाने गुंडाळणारी अळी

या अळीचा उपद्रव दिसून आल्यास खालीलपैकी कोणत्याही एका किटकनाशकाचा वापर करावा.

कारटॅप हायड्रोक्लोराईड ५०० ग्रॅम किंवा ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम किंवा क्लोरपायरिफॉस २०टक्के १८७५ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के १००० मिली प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारावे. .

३. तपकिरी तुडतुडे

पाण्याचा योग्य तऱ्हेने निचरा न होणाऱ्या खाचरात तपकिरी तुडतुडयांचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी खोडावर तुडतुडे बसून रस शोषण करतात त्यामुळे पाने पिवळी पडतात. या किडीच्या बंदोबस्तासाठी पुढील उपाय योजना करा.

अ. नत्र खताची दुसरी मात्रा विभागणी करुन द्यावी

ब. एका चुडात ३ ते ४ तुडतुडे आढळले तर किटकनाशकांचा वापर करावा त्यासाठी ५०० लि. पाण्यातून खालीलपैकी एका किटकनाशकाची फवारणी करा. कार्बारिल ५० टक्के २००० ग्रॅम किंवा डायक्लोरव्हॉस ७६ टक्के ४७० मिली किंवा फिप्रोनिल ५ टक्के १००० मिली

क. फवारणी खोडांवर बसेल याची काळजी घ्यावी.

४. निळे भुंगेरे

निळे भुंगेरे भाताच्या पानातील हरितद्रव्य खातात. यामुळे सुरुवातीला पांढरे पट्टे दिसून येतात. नंतर पुर्ण पीक वाळते. ही लक्षणे दिसू लागल्यास प्रति हेक्टरी ट्रायझोफॉस ४० टक्के ६२५ मिली किंवा लाम्डासायहेलोथ्रिन ५ टक्के २५० मिली किंवा २५ टक्के क्विनॉलफॉस २००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

५. भातावरील टोळ

ही कीड भाताची पाने खाते व पिकांचे नुकसान करते. हे टोळ मोठया प्रमाणावर आढळून आल्यास २ टक्के मिथील पॅरॅथिऑन भुकटीची २० किलो / हे. धुरळणी करावी.

६. लष्करी अळी

या कीडीचा प्रादुर्भाव आढळल्यास मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी धुरळावी किंवा डायक्लोरव्हॉस ७६ टक्के ६५० मिली. ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारणी करा.

७. बुरशीजन्य करपा :

फुटवे येण्याच्या अथवा लोंबी मिसवल्यानंतर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ट्रायसायक्लॅझोल (७५ टक्के ) या बुरशीनाशकाच्या दोन फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने घ्याव्यात. त्यासाठी १० ग्रॅम बुरशीनाशक १० लि. पाण्यातून फवारणीसाठी वापरावे.

नागली

१. नागली पिकातील तणांची बेणणी राहीली असल्यास करा.

२. नत्राचा दुसरा हप्ता दर हेक्टरी ४० किलो या प्रमाणात द्या.

वरी

१. बेणणी करा

२. नत्राचा दुसरा हप्ता दर हेक्टरी ४० किलो या प्रमाणात द्या.

कुळीथ

अधिक पाणी असल्यास पिकाचे नुकसान होते म्हणून पावसाचे प्रमाण अधिक असल्यास शेतातील पाण्याचा निचरा करा.

उडीद व मूग – बेणणी करा

तेलबिया

कारळा – १. पिकातील तण काढावयाचे राहीले असल्यास काढणी पूर्ण करा

२. नत्राचा दुसरा हप्ता द्यावयाचा राहीला असल्यास दर हेक्टरी १२.५ किलो नत्र द्या.

भुईमूग

१. तणांचा बंदोबस्त करा

२. पिकात पाणी साचणार नाही याची काळजी घ्या

३. मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १२५ मिली. ५०० लि. पाण्यातून फवारावे. किंवा मिथील पॅराथिऑन २ टक्के भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी धुरळावी.

ऊस – शेतातील पाण्याचा योग्य कनिचरा होईल या बाबींकडे लक्ष द्या.

## सप्टेंबर पहिला पंधरवडा

१. भात (हळवे भात)

२. भात पसवू लागेल व दाणे भरु लागतील भात खाचरात पाणी राहील या बाबीकडे लक्ष द्या.

३. पिकाची किड व रोग यांच्या प्रादुर्भावासंबंधी पहाणी करा.

निमगरवे व गरवे भात

१. भातातील तण काढून घ्या.

२. नत्र खताची तिसरी मात्रा हेक्टरी २० किलो या प्रमाणात द्या. ही मात्रा निमगरव्या भात जाती बाबत लावणीनंतर ८५ ते ९० दिवसांनी आणि गरव्या भात जातीबाबत १०५ ते ११० दिवसांनी द्यावयाची आहे.

३. पीक संरक्षणाकडे लक्ष द्या.

४. भाताची लागवड उशिरा झाली असल्यास १० किलो नत्र वाढवून द्यावे.

ऊस –

पावसामध्ये ऊस लोळत असल्यास ४–५ ऊस एकत्र बांधून उभा करावा.

नागली

१. बेणणी करा.

२. लष्करी अळीच्या प्रादुर्भावाची शक्ता असल्यामुळे पिकाचे चांगले निरीक्षण करा. प्रादुर्भाव दिसून येताच मिथील पॅराथिऑनची भुकटी (२ टक्के) २० किलो प्रति हेक्टरी धुरळा. धुरळणी सायंकाळी उशिरा करावी.

कडधान्य

तूर – बेणणी करा व किडीचे नियंत्रण करा.

कारळा –

कारळा क्षेत्रात पाणी साचणार नाही याची काळजी घ्या.

१. अमरवेलीचा प्रादुर्भाव झाल्यास असल्यास अमरवेल हाताने वेचून घ्या व खडडयात टाका.

२. अमरवेलग्रस्त कारळा बियाणासाठी वापरु नका.

## उद्यानविद्या

आंबा

१. मागील वर्षी लागवड केलेल्या एक वर्षे वयाच्या झाडास १ घमेले कुजलेले शेणखत अधिक १५० ग्रॅम नत्र (३०० ग्रॅम युरिया) अधिक १५० ग्रॅम स्फूरद (३०० ग्रॅम सुपर फॉस्फेट) अधिक ५० ग्रॅम पालाश (१०० ग्रॅम पोटॅश) द्या. खते झाडापासून ३० से.मी अंतरावर १६ सें.मी. खोल चरामध्ये टाका व मातीने झाका.

२. आंब्याच्या नवीन पालवीवर शेंडे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होतो यासाठी किडग्रस्त पालवी अळीसहीत नष्ट करावी. नवीन पालवी येण्यास सुरुवात झाल्यावर १० मि.ली. मोनोक्रोटोफॉस १० लि पाणी प्रती झाड प्रमाणे फवारणी करावी.

३. आंब्याच्या मोठया कलमांना शिफारशीप्रमाणे खते द्या.

४. आंब्याची लागवड राहीली असल्यास ती पूर्ण करुन घ्यावी.

५. हापूस आंब्याला दरवर्षी नियमित व लवकर फळे धरण्यासाठी कलमाच्या वाढीच्या विस्ताराच्या प्रती मीटर व्यासास ३ मिली. कल्टार या प्रमाणात कल्टारची मात्रा द्यावी. याचा अर्थ व्यास ५ मीटर असल्यास त्या कलमास १५ मिली कल्टार शिफारस केलेल्या पध्दतीनुसार द्यावे.

काजू

१. काजूच्या मागीलवर्षी लागवड केलेलया कलमांना प्रत्येकी १२५ ग्रॅम नत्र, ५० ग्रॅम स्फुरद व ५० ग्रॅम पालाश या प्रमाणाात खते द्या. खते झाडांभोवती ३० से.मी. अंतरावर १५ से.मी. खोल गोलाकार चरामध्ये टाका व मातीने झाका.

२. काजूच्या मोठया कलमांना शिफारशीप्रमाणे खते द्या.

फांदे मर (डायबॅक) (आंबा व काजू) यामध्ये झाडाच्या फांद्या टोकाकडून वाळतात. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगग्रस्त फाद्या कापून झालेल्या भागावर बोर्डोपेस्ट (१: १: ३०) लावावी. तसेच पावसाची उघडीप पाहून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी या महिन्यात घ्यावी.

नारळ

१. मागील वर्षी लागवड केलेल्या माडात १ घमेले शेणखत अधिक २५० ग्रॅम नत्र (५०० ग्रॅम युरिया) अधिक १०० गॅम स्फुरद (६०० ग्रॅम सुपर फॉस्फेट) अधिक १९५ ग्रॅम पालाश (३२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) झाडाभोवती सर्वसाधारणपणे ३० सेमी खोलीच्या वरच्या थरात देवून मातीत मिसळावे.

२. काडी कचरा वेचून बाग स्वच्छ ठेवावी.

३. कुजलेला कोंब स्वच्छ करुन त्यावर एक टक्का बोर्डोमिश्रण ओतावे

सुपारी

१. पाणी न साचणाऱ्या ठिकाणी या महिन्यात श्रीवर्धन रोठा या जातीची लागवड करावी.
२. रोपे निरोगी व जोमदार असावीत.
३. रोपे १२ ते १८ महिने वयाची असून त्याचा बुंधा जाड असावा.
४. सुपारीच्या झाडांना खतांचा पहिला हप्ता द्या. १ घमेले शेणखत, १२ कि. हिरवळीचे खत, ७५ ग्रॅम नत्र (१५० ग्रॅम युरिया) अधिक ७५ ग्रॅम स्फुरद (४५० ग्रॅम सुपर फॉस्फेट) ७५ ग्रॅम पालाश (१२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) या मात्रेचा १/३ भाग पहिल्या वर्षी
२/३ भाग दुसऱ्या वर्षी व तीन वर्षे त्यानंतरच्या प्रत्येक झाडास वरील खतांची संपूर्ण मात्रा द्यावी.
५. सुपारीवर कोळे रोगाचा प्रादुर्भाव हातो. हा रोग फायटोप्थोरा अरेकी या बुरशीपासून होतो. यापासून झाडांना संरक्षण मिळण्यासाठी खालील प्रमाणे उपाय करावेत.

- सुकलेली शिंपुटे, फळे आणि झावळया काढून बाग स्वच्छ करा.
- पोफळीवर आणि पानांच्या बेचक्यात एक टक्का बोर्डोमिश्रणाचा फवारा मारा. पावसाने औषध धुवून जाऊ नये म्हणून या द्रावणात टीपॉल (२ मि.ली.) / १ लिटर पाणी) किंवा सॅडोवीट यासारखे पदार्थ वापरा.
- बांड रोगापासून सुपारीच्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी बागेमध्ये वेळोवेळी आंतर मशागत करावी व योग्य अंतरावर चर खणून पाण्याचा चांगला निचरा करा.

मिरी

१. परसामधील व बागेतील सुपारी झाडाजवळ प्रत्येकी मिरीची दोन रोपे लावावीत.
२. मिरी लागवडीसाठी पन्युर १ जातीची निवड करावी
३. मिरी लागवड जून किंवा जुलै मध्ये केली असल्यास २५ ग्रॅम नत्र, २५ ग्रॅम स्फुरद, २५ ग्रॅम पालाश द्यावे.
४. मिरीची पांगाऱ्यावर स्वतंत्रपणे लागवड करा.

भाजीपाला

१. वेल भाज्यांच्या अळयातील साचलेल्या पाण्याचा योग्य निचरा करा.
२. नत्राचा दुसरा हप्ता दर हेक्टरी ५० कि. या प्रमाणात द्या
३. भाजीपाला पिकातील तणांचा बंदोबस्त करा

सामाजिक वनीकरण

१. नवीन लागवड केलेल्या झाडांचे भटक्या जनावरांपासून संरक्षण करा.

पशुसंवर्धन

१. गाई, म्हशी किंवा शेळयामध्ये गर्भपात झाल्यावर पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा. गर्भपात रोग जंतुमुळे होण्याची शक्यता असते.
२. दिड वर्षाहून अधिक वयाच्या कोंबडया अंडयांसाठी फायदेशीर ठरत नाही म्हणून त्या विक्रीस काढा
३. मटणाचे जास्त उत्पादनासाठी बोकड ६ महिन्यांचा असताना चिमटा पध्दतीने खच्चीकरण करा.
४. गाभण शेळया—मेंढयांना खुराक द्या म्हणजे सशक्त व अधिक वजनाची पिल्ले मिळतात.

——००——

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश ( रत्नागिरी/सिंधुदूर्ग)

## सप्टेंबर – ऑक्टोबर,

### सप्टेंबर (दुसरा पंधरवडा)

हळवे भात

१. भात पसवलेल्या क्षेत्रात पाणी खेळते ठेवा.
२. भात पक्व होऊ लागलेल्या शेतातील पाणी काढून टाका.

निम गरवे व गरवे भात

१. नत्राचा तिसरा हप्ता (दर हेक्टरी) २० किलो नत्र या प्रमाणात द्यावयाचा राहिला असल्यास पूर्ण करा. उशिरा लावलेल्या भातात नत्राचा हप्ता द्यावयाचा राहिला असल्यास २० किलो नत्र द्या.
२. रोग व किडींचा उपद्रव दिसून आल्यास पुढीलप्रमाणे बंदोबस्त करा.

आभासमय काजळी

रोगग्रस्त लोंब्या कापणीपूर्वी वेगळया काढून नंतर पिकाची कापणी करा.

पिंगट ठिपका

या रोगाची लक्षणे दिसून येताच प्रति हेक्टरी १ किलो झायनेब (डायथेन झेड–७८) किंवा १.२५ किलो कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

करपा

रोगाच्या नियंत्रणासाठी सीओसी–१२५० ग्रॅम किंवा डायथेन झेड–७८, १ किलो किंवा ५०० ग्रॅम कार्बेडॅझिम/५०० लि. पाण्यात मिसळून फवारावे. करपा दिसून आल्यास नत्राची मात्रा रोग आटोक्यात आल्यानंतर द्यावी.

उदबत्त्या

या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी रोगट लोंब्या काढून एकत्रित जाळाव्यात.

खोडकिडा

५ टक्के खोडकिडीचे प्रमाण असल्यास आणि भाताचे पीक गरव्या किंवा निमगरव्या जातीचे असल्यास १६००मि.ली.
क्विनॉलफॉस २५ ई.सी.५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टरक्षेत्रावर पाऊस नसताना फवारावे. किंवा कार्बोफयुरॉन
(३ टक्के दाणेदार) २५ कि. किंवा पिप्रोनिल ०.३ टक्के दाणेदार २५ कि. प्रति हे. प्रमाणात वापरावे. शेतात पाणी राहील याची दक्षता घ्यावी.

पाने गुंडाळणारी अळी

या अळीचा उपद्रव दिसून आल्यास खालीलपैकी कोणत्याही एका किटकनाशकाचा वापर करावा.
कारटॅप हायड्रोक्लोराईड ५०० ग्रॅम किंवा ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम किंवा क्लोरपायरिफॉस २०टक्के १८७५ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के १००० मिली प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारावे.

लष्करी अळी

सप्टेंबर महिन्यात प्रामुख्याने या किडीच्या बंदोबस्तासाठी पुढील उपाययोजना करावी.

डायक्लोरव्हास ७६ इसी. ६५० मि.लि. किंवा २ टक्के मिथिल पॅरॅथिऑन भुकटी २० किलो संध्याकाळी वारा नसताना धुरळणी करावी.

तपकिरी तुडतुडे आणि पानावरील तुडतुडे

पाणी साचून राहणाऱ्या भात खाचरात या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने दिसून येतो. रोपांच्या बुध्यावर १० पेक्षा जास्त तुडतुडे आढळल्यास पुढील उपाययोजना करावी.

१. इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल १२५ मि.लि. किंवा थायोमेथॉक्झान २५ डब्ल्यू जी. १०० ग्रॅ.
२. ट्रायझोफॉस ४० इसी. ७५० मि.लि.
३. कारटॅफ हायड्रोक्लोराईड ५० एस्.पी. १००० ग्रॅम.
४. फलुबेंडयामाईड २० डब्लू. जी .१२५ ग्रॅम
५. क्लोरोपायरीफॉस २० ईसी २००० मि.लि.
६. ॲसीफेट ७५ एस.पी. ७०० ग्रॅम

वरीलपैकी एक औषध ५०० लिटर पाण्यातून एक हेक्टर क्षेत्रावर फवारावे.

*सूचना– फवारणी करताना पानाच्या खालील भागावर व बुंध्यावर फवारणी होईल याची काळजी घ्यावी.*

निळे भुंगेरे

भात वाढीच्या अवस्थेत ही कीड पानावर पांढरे पट्टे पाडून कालांतराने पीक करपल्यासारखे (जळाऊ) दिसते. या किडीच्या बंदोबस्तासाठी प्रति हेक्टरी ट्रायझोफॉस ४० इसी. ६२५ मि.ली. किंवा लॅम्डासायहेलोथ्रिन ५ टक्के २५० मिली. ५०० लिटर पाण्यातून फवारावे.

नागली

रोग व किडीच्या प्रादुर्भावापासून पिकाचे संरक्षण करा. विशेषत: लष्करी अळीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष द्या.

वरी

वरीच्या लोंब्या तयार होऊ लागतील. पक्व लोंब्या काढून घ्या व चांगल्या वाळू द्या. (दाणे पक्व होताच गळू लागतात)

तेलबिया (भुईमुग)

१. आऱ्या झाकल्या जाव्यात म्हणून काळजी घ्या.
२. मावा किडींचा उपद्रव दिसून आल्यास इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के १२५ मिली ५०० लि. पाण्यातून फवारावे किंवा मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी २५ किलो प्रती हेक्टरी धुरळावी.

## ऑक्टोबर पहिला पंधरवडा

अ) हळवे भात

पक्व भाताची कापणी वैभव विळयाच्या सहाय्याने जमिनीलगत करा.

कापलेले भात शेतात २ ते ३ दिवस चांगले वाळू द्या.

वाळलेल्या भाताच्या पेंढया बांधून ते भिजणार नाही अशा त–हेने उडवी रचा.

उंदीर घुशीपासून उडव्याचे संरक्षण करा.

ब) निमगरवे भात

१. भात पक्व होऊ लागेल. या भात खाचरात पाणी राहील याची काळजी घ्या.
२. कापणीपूर्वी दहा दिवस अगोदर शेतातील पाण्याचा निचरा करा.
३. लष्करी अळीच्या उपद्रवाबाबत दक्षता घ्या आणि वेळीच उपाय योजना करा.

क) गरवे भात

१. भात पोटरीत असेल अशावेळी पाणी खेळते राहील याकडे लक्ष द्या.
२. रोग व किडीचा उपद्रव दिसून येताच उपाय योजना करा.

नागली

हळव्या नागलीची तयार कणसे वेचून घ्या.
वेचलेली कणसे उन्हात चांगली वाळू द्या.
कणसे वाळल्यावर मळणी करा.
नागलीत रोग व किडीचा उपद्रव आढळून आल्यास भात पिकांवरील किडीच्या प्रकारानुसार औषधाचा वापर करा.

वरी

१. वरीची तयार कणसे वेचून घ्या
२. वेचलेली कणसे उन्हात चांगली वाळू द्या
३. काड वाळताच कापून पेंढया रचा

कडधान्ये

१. उडीद, मूग, मटकी या पिकाच्या तयार शेंगा वेचून घ्या.
२. शेंगा वाळल्यानंतर मळणी करा.

तेलबिया (कारळा)

१. पीक तयार झाल्यावर जमिनीलगत विळयाने कापणी करा.
२. दोन–तीन दिवस उन्हात वाळू द्या.
३. वाळल्यानंतर काठीच्या सहाय्याने मळणी करा.

भुईमूग

१. भुईमुग पिकाची पाने पिवळी दिसू लागताच शेंगा तयार झाल्या असे समजून पिकाची काढणी करा.
२. वेलापासुन वेगळया केलेल्या शेंगा उन्हात चांगल्या वाळवा
३. बियाण्यासाठी चांगल्या टपो–या शेंगा निवडा. या शेंगा चांगल्या वाळवा व नंतर साठवण कराण

## उद्यानविद्या

आंबा

१. आंबा पिकामध्ये अनुत्पादित झाडांची छाटणी ( पुर्नजीवन ) करा.
२. शेंडे पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी नवीन फुटीचे डोळे उघडण्यास सुरुवात होताच पुढील उपाय योजना करावी.
३. १० लिटर पाण्यात मोनोक्रोटोफॉस – ३६ टक्के प्रवाही ११ मि.ली. फवारावे.
४. किडग्रस्त काडयांचा अळीसह नाश करा.
५. आंब्याच्या झाडांना कोवळी फुट आल्यास तुडतुडयाच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन ३ मि.ली किंवा फेनव्हलरेट ५ मि.ली. किंवा डेकॅमेथ्रिन ९.० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून खोडावर व फांद्यांवर फवारावे.

काजू

फांद्यावरील मर – फांद्या टोकाकडून वाळू लागतात. अशा फांद्या कापून टाकाव्यात व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट (१:१:३०) लावावी व १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी झाडावर करावी.

नारळ

१. बाग स्वच्छ करा. काडी कचरा कंपोस्ट खडडयात टाका.
२. उंदराचा बंदोबस्त करा. जमिनीपासून २ मीटर उंचीवर बुंद्याच्या सभोवताली ३० से.मी. रुंदीचा गुळगुळीत पत्रा लावा तसेच उंदीर नियंत्रणासाठी झींक फॉस्फॉईड सारख्या विषारी आमिषाचा वापर करा.

कोंब कुजणे

9. नवीन लागवडीत कोंब कुजलेले आढळल्यास शेंडा स्वच्छ करुन त्यावर बोर्डोपेस्ट लावावे तसेच झाडावर १ टक्का बोर्डोमिश्रण फवारावे. कार्बेडायझिम १ ग्रॅम प्रती लि. प्रमाणे कोंब स्वच्छ करुन त्याठिकाणी ओतावे. ( ड्रेचिंग)

नारळावरील गळ

१. पाऊस थांबताच लगेच पाणी देण्याची व्यवस्था करावी.
२. बुरशीजन्य रोगामुळे नारळाच्या वाढणाऱ्या फळांची गळ होत असल्यास एक टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. तसेच खाली गळलेली फळे गोळा करुन जाळून टाका.

सुपारी

१. बाग स्वच्छ ठेवा. काडी कचरा गोळा करुन नष्ट करा.
२. अळंबी या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास पोफळीचा शेंडा पिवळा दिसू लागतो व पाने खाली वाकतात. तसेच बुंध्यातून तांबडा चिकट पदार्थ वाहत आलेला दिसतो. नंतर खोडावर अळंब्याची वाढ झालेली दिसते. थोडया अवधीत झाडाचा कोंब वाळतो व झाड मरते.
३. अळंबी उगवून मेलेली झाडे मुळासकट काढून जाळावीत. तसेच लागण झालेल्या झाडांच्या बुंद्याभोवती चर काढून त्यात गंधक व चुना यांची भुकटी १:१ या प्रमाणात प्रत्येक चरात १ किलो प्रमाणात टाकावी.
४. नुकतीच लागण झालेल्या पोफळीच्या बुंध्यावर मुळालगत २ टक्के बोर्डोमिश्रणाची १५ लिटर द्रावणाची भिजवण करावी.
५. मेलेल्या झाडाच्या ठिकाणी कमीत कमी ६ महिने नवीन रोपाची लागवड करु नये.
६. कोळेरोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण फवारणी पावसाळयापूर्वी व पाऊस संपताना करावी. किंवा इलाइट– ३ ग्रॅम प्रती लि. प्रमाणे मुळावाटे द्यावे.

केळी

१. जुन्या बागेतील वाळलेली पाने गोळा करा.
२. बाग स्वच्छ करा. विशेषत: पर्णगुच्छ रोग झालेली झाडे व मुनवे मुळासकट काढून जाळून टाका.
३. केळफुल आल्यानंतर मुनवे लागवडीसाठी ठेवा.
४. नवीन लागवडीसाठी निरोगी मुनव्याची लागवड करा. पर्णगुच्छ नसलेल्या बागेतील झाडाचे मुनवे लागवडीसाठी वापरा.
५. लागवड करताना प्रत्येक खड्डयामध्ये ३ टक्के कार्बोफयुरान ५०ग्रॅम टाकावे ही मात्रा अडीच महिन्याच्या अंतराने जमिनीतून आणखी दोन वेळा द्यावी.

काळीमिरी

१. नवीन वाढणा–या वेलीना झाडावर चढण्यासाठी आधार द्या
२. तीन वर्ष व अधिक वयाच्या जुन्या वेलींना पुढीलप्रमाणे खते द्या
३. शेणखत २ घमेली , २ किलो एरंडाची किंवा कडूनिंबाची पेंड , ७५ ग्रॅम नत्र (१५० ग्रॅम युरिया) , ७५ ग्रॅम स्फुरद (५०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट) , ७५ गॅम पालाश १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश ही खते वेलीपासून ३० सें.मी. अंतरावर चर काढून त्यामध्ये द्यावीत. आठ वर्षापेक्षा अधिक वय असल्यास खताची मात्रा वाढवावी तसेच ३ वर्षपेक्षा कमी वय असल्यास वरील मात्रेच्या १/३ भाग पहिल्या वर्षी व २/३ मात्रा दुस–या वर्षी द्यावी.

भाजीपाला

१. वांगी, मिरची, टोमॅटो व इतर फळभाज्यांच्या हिवाळी लागवडीसाठी रोपवाटिका तयार करा.
२. खरीपात लागवड केलेल्या फळ भाज्यांबाबत पुढीलप्रमाणे काळजी घ्या.

वांगी

५ टक्के कडूलिंब बियांचा अर्क फवारावा. ( ५ कि. कडूलिंब बियाणे फोडून रात्रभर भिजून अर्क काढून १०० लि. पाण्यात मिसळून फवारावे. )

करपा रोग दिसून आल्यास डायफोलेटान ०.२ टक्केची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करा.

## घोसाळी, दोडकी व भोपळे

या पिकावर काळे व तांबडे भुंगे, फळमाशी या किडींचा उपद्रव होण्याची शक्यता आहे. या किडी दिसताच पुढील उपाय योजना करावी. काळे व तांबडे भुंगे मोठया प्रमाणात असल्यास ५०० मिली. डायक्लोरव्हॉस ७६ टक्के पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रासाठी फवारणी करा. फळमाशीच्या नियंत्रणासाठी बाग स्वच्छ ठेवा. गळून पडलेली फळे दररोज वेचून त्याचा नाश करावा. फळे लागणीस सुरु झाल्या झाल्या लगेच रक्षक सापळे लावून फळमाशांचा नायनाट करा. केवडा रोगासाठी मॅन्कोझेब (२.५ ग्रॅम/लिटर) पाण्यातून फवारावे.

## सामाजिक वनीकरण

१. सामाजिक वनीकरणांतर्गत लावलेल्या रोपांची देखभाल करा दृ

## पशुसंवर्धन

१. म्हशी व्यायल्यानंतर वासराला चीक देण्यात यावा. वजनाच्या १० टक्के (२ ते २.५ लिटर/दिनी)
२. आंत्र विषार रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक लस टोचून घ्या. परत १५ दिवसांनी ही लस न चुकता टोचावी.
३. हिरव्या चा—यासाठी मका/ चवळी पिकाची पेरणी करावी. बहुवार्षिक चारा पिकांची (गिनी, नेपियर गवत) लागवड करावी.
४. जनावरांना जंतनाशके औषधे पाजावीत.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश

## रत्नागिरी / सिंधुदुर्ग

## कालावधी– ऑक्टोबर,–नोव्हेंबर,

## ऑक्टोबर दुसरा पंधरवडा

*भात*

अ) हळवे भात

भात कापलेल्या क्षेत्रात वापसा येताच नांगरट करा व धस्कटे वेचून नष्ट करा.

पाट पाण्याखाली येणा–या क्षेत्राची बांधबंदिस्ती करा.

ब) निमगरवे भात

१. कापणीस तयार असलेल्या खाचरातील पाण्याचा निचरा करा.

२. तयार भाताची कापणी वैभव विळयाने जमिनीलगत करा.

३. कापलेले भात कोरडया जागी पसरा.

४. दोन ते तीन दिवस भात वाळल्यानंतर सुरक्षित जागी पेंढया रचा.

५. मोकळया खाचरात योग्य ओलावा असताना नांगरट करा. धस्कटे वेचून नष्ट करा.

क) गरवे भात

१. ज्यावेळी भात पसवू लागेल अशा भात खाचरात पाणी साठून राहील याची काळजी घ्या.

२. लष्करी अळी या किडींचा उपद्रव दिसून आल्यास २टक्के मिथिल पॅरॅथिऑन भुकटी २० किलो धुरळावी किंवा ५०० मिली. डायक्लोरव्हॉस ५०० लि. पाण्यातून फवारावे. फवारणी शक्यतो सायंकाळी उशिरा करावी. औषधाचा फवारा बुंध्यात पोहोचेल अशा पध्दतीने करावा.

नागली

१. नागलीची तयार कणसे वेचून घ्या.

२. कणसे उन्हात वाळू द्या.

३. काड कापून चांगली वाळविल्यास गुरांसाठी त्याचा चांगला उपयोग होतो.

४. चांगल्या वाळलेल्या काडाची साठवण करा.

५. लष्करी अळी प्रादुर्भाव क्षेत्रात नांगरट करा.

कडधान्ये

१. उडीद, मुग, उन्हात वाळवून मळणी करा.

२. बियाणे वेगळे काढा व चांगले वाळवून गोडेतेल लावून साठवण करा

तेलबिया (भुईमूग)

१. पक्व शेंगाची काढणी करा.

२. शेंगा उन्हात चांगल्या वाळवा.

३. वाळलेल्या शेंगाची साठवण करा.

४. बियाण्यांसाठी टपो–या पूर्ण भरलेल्या शेंगाची निवड करा. शेंगा उत्तम वाळवून प्लॅस्टिकच्या पिशवीत भरुन हवाबंद पिंपात साठवण करा.

## नोव्हेंबर पहिला पंधरवडा

भात

अ) खरीपातील गरवे भात

१. पक्व भाताची कापणी वैभव विळयाच्या सहायाने जमिनीलगत करा.
२. कापलेले भात दोन ते तीन दिवस शेतात चांगले पसरुन ठेवा. पेंढा वाळताच भाताच्या पेंढया बांधून सुरक्षित जागी उडवी रचा.
३. खरीप भात पिकामध्ये बुरशीजन्य करपा, कडा करपा, आभासमय काजळी रोगाचा प्रादुर्भाव झालेला असल्यास अशा क्षेत्रातील पिकाची स्वतत्ररित्या झोडणी करुन असे भात पुढील हंगामासाठी बियाणे म्हणून वापरु नये.

आ) उन्हाळी भाताची तयारी

१. उन्हाळी भात क्षेत्रातील खाचरात वापसा येताच नांगरट करा.
२. आवश्यकता भासल्यास शेत समपातळीत आणा. शेतांची बांधबंदिस्ती करा. उंदरांची, खेकडयांची बिळे (नळ) बंद करा.
३. पुरेशी ओल असल्यास ताग किंवा धेंच्या यासारखी हिरवळीची खते द्या. यासाठी तागाचे ८० किलो अगर धेंच्या वापरावयाचा झाल्यास दर हेक्टरी ४० किलो बियाणे लागेल. दर हेक्टरी १२ गाडया कंपोस्ट अगर शेणखत घाला.
४. पाण्याची उपलब्धता लक्षात घेवून रोपवाटिकेसाठी जागेची निवड करा.
५. अशा क्षेत्रात १ मिटर रुंदीचे गादीवाफे तयार करावयाचे झाल्यास नांगरटीनंतर ढेकळे फोडून जमिन भुसभुशित करा.
६. एक हेक्टर क्षेत्रातील भात लागवडीसाठी १० आर क्षेत्र रोपवाटिका पुरेशी आहे.
७. बुटाक्लोर (२० टक्के प्रभावी) ३० मिली ५ लिटर पाण्यात मिळून एक हेक्टर क्षेत्रात पेरणीनंतर जमिनीत ओलावा असताना दोन दिवसांचे आत फवारावे. हेक्टरी ५००—६०० लिटर पाणी वापरावे.
८. बियाणांचे प्रमाण अ) जाड दाण्यांच्या जाती दर हेक्टरी ५० किलो बियाणे.
   ब) बारीक दाण्यांच्या जाती दर हेक्टरी ४० किलो बियाणे.
९. उन्हाळी भातासाठी सुधारीत जाती.

| | | | |
|---|---|---|---|
| १)कर्जत—१८४ | २) रत्ना | ३) रत्नागिरी—१ | ४) रत्नागिरी—७३ |
| ५) रत्नागिरी—२४ | ६) रत्नागिरी—७११ | ७) कर्जत—१ | ८) कर्जत—३ |

सूचना— पेरणीपूर्वी ३ टक्के मिठाच्या द्रावणात भात बियाणे बुडवून जड बियाणे स्वच्छ पाण्याने दोन किंवा तीनवेळा धुवावे. नंतर २४ तास सावलीत वाळवावे. १ किलो बियाण्यास २.५ ग्रॅम या प्रमाणात थायरम, याप्रमाणात बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी.

नागली

१. गरव्या नागलीची पक्व कणसे कापून घ्या.
२. नागलीची कणसे उन्हात चांगली वाळू दया.

सिंधुदुर्ग जिल्हा उन्हाळी नागली

१. उन्हाळी नागलीसाठी निचरा होणारे शेत निवडा.
२. उन्हाळी नागलीच्या रोपवाटिकेसाठी गादीवाफे तयार करा.
३. पेरणीसाठी दापोली १ या भरघोस उत्पन्न देणाऱ्या जातींचे तसेच गोदावरी या जातीचे बियाणे मिळवा. दर हेक्टरी ६ किलो बियाणे वापरा.

कडधान्ये

हरभरा

१. हे पीक अंग ओलितावर घ्यावयाचे झाल्यास भात कापणीनंतर वापसा येताच शेतात नांगरट करा. तसेच ढेकळे फोडून जमिन तयार करा.
२. पेरणीपूर्वी प्रती हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद बियाणांखाली मातीत पडेल असे द्या. खताचा बियाणाशी संपर्क येऊ नये याची काळजी घ्या.
३. पेरणीसाठी हेक्टरी ४०किलो बियाणे वापरा.
४. विजय, विश्वास अथवा एन–५९ यापैकी एका जातीची निवड करा.

कुळीथ

१. जमिन वापसावर येताच नांगरट करा.
२. प्रति हेक्टरी २० किलो नत्र व ४० किलो स्फुरद खताची मात्रा बियाण्याखाली द्या.
३. प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरा.
४. पेरणी ओळीत करा. दोन ओळीत २२.५ सेमी ते ३० सेमी अंतर ठेवा
५. दापोली १ या जातीच्या बियाण्याचा वापर करा.

उडीद

१. जमिनीची नांगरट करुन जमिन भुसभुशीत करा.
२. दर हेक्टरी २५ किलो नत्र व ५० स्फुरदाची मात्रा बियाणाखाली पडेल असे द्या.
३. प्रती हेक्टरी २० किलो बियाणे वापरा.
४. उडीद –सिंधखेडा, उडीद–५५, उडीद टी–९ यापैकी एका जातीचे बियाणे वापरा.

कडवा

१. भाताचे पीक काढून येताच योग्य ओलावा असताना नांगरट करा.
२. उपलब्धतेप्रमाणे ८ ते १० टन शेणखत मातीत मिसळा. तसेच दर हेक्टरी २५ किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद मातीत चांगले मिसळा.
३. पेरणीसाठी कोकण वाल १ व कोकण वाल २ या जातीचे दर हेक्टरी ४० किलो बियाणे वापरा.
४. पेरणी ओळीत करा. दोन ओळीत २२.५ ते ३० सेमी अंतर ठेवा.

मुग

१. ओलीताची सोय असलेल्या क्षेत्रातच हे पीक घ्यावे. भात कापणीनंतर वापसा येताच शेत नांगरुन ढेकळे फोडून त्यात ५ टन सेंद्रीय खते मिसळून जमिन सपाट करावी.
२. या पिकाला दर हेक्टरी २५ किलो नत्र अधिक ५० किलो स्फुरद बियाणाखाली पडेल असे द्यावे.
३. या पिकासाठी जे–७८१ किंवा ८ फुले मुग या जातींचे बियाणे वापरावे. दर हेक्टरी २५ किलो बियाणे लागते.

तेलबिया– भुईमुग

१. ओलीताखाली उत्तम निचरा होणाऱ्या जास्तीत जास्त क्षेत्रात भुईमुग पीक घ्या.
२. जे.एल–२४ एस.बी.११ कोकण गौरव, ट्रॉम्बे कोकण टपोरा, टी.जी.२६ यापैकी एका जातीचे बियाणे मिळवा. दर हेक्टरी १०० ते ११० किलो (दाणे) पुरेसे आहे. बियाण्यास ३ ग्रॅम/किलो प्रमाणे थायरम किंवा कॅप्टन यापैकी एका बुरशी नाशकाची प्रक्रिया करा.
३. पेरणीपूर्वी प्रती हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद बियाणाखाली पडेल असे द्या.
४. पेरणी ३० X १५ सेमी अंतराने करा.
५. पेरणीपूर्वी जमिन चांगली भिजवावी व वापसा येताच पेरणी करावी. पेरणीनंतर ३ दिवसांनी हलके पाणी द्यावे म्हणजे उगवण चांगली होते.
६. पेरणीनंतर बियाण्याचे पक्षांपासुन तसेच डुकरापासून संरक्षण करा.

आंबा

१. नवीन लागवडीतील कलमांसभोवतालची छोटी मोठी झुडपे व इतर काडी कचरा गोळा करुन नष्ट करा.
२. नवीन लागवडीत पालवीवर शेंडा पोखरणाऱ्या अळीचा प्रार्दुभाव दिसून आल्यास किडग्रस्त फूट काढून तिचा अळीसह नाश करा. तसेच नवीन पालवी फुटू लागताच मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के ११ मि.ली. किंवा २५ टक्के क्युनॉलफॉस २० मि.ली. किंवा ५० टक्के कार्बारील २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे.
३. फांद्यांची मर दिसून आल्यास रोगग्रस्त फांदी रोगट भागापासून १५ से.मी. खाली कापून टाका व त्या कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट (१:१:१०) लावा.
४. मोठया झाडाच्या रोगट व अशक्त फांद्याची काढणी करा.

काजू

१. काजू कलमांभोवती वाढलेली झुडूपे नष्ट करा.
२. नवीन कलमाच्या जोडाखालील धुमारे नष्ट करा.
३. या हंगामात जुन्या लागवडीत खोडकिडीचा (रोठा) प्रार्दुभाव दिसून आल्यास त्याचे नियंत्रण करा. या किडीची अळी झाडाची साल पोखरुन आतील गाभा खाते. झाडातून डिंक व लाकडाचा भूसा बाहेर आलेला दिसतो यावरुन किडीचा प्रार्दुभाव झाला आहे असे समजावे. या किडींचे नियंत्रणासाठी किडग्रस्त भागाची साल १५ मि.ली. मिटर पटाशीच्या सहाय्याने साफ करा. आणि आतील अळीचा नाश करावा.

फांद्यावरील मर

वाळलेल्या फांद्या कापून जाळून नष्ट करा. कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावा व एक टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करा.

नारळ

१. नारळाचे बागेतील मेलेली झाडे कापून जाळून टाका. तसेच झावळया, काडी कचरा गोळा करुन नष्ट करा.
२. पाऊस बंद झाला असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करा.
३. नत्र व पालाश खताचा दुसरा हप्ता सप्टेंबर मध्ये द्यावयाचा राहीला असल्यास पुढील खताच्या मात्रेच्या १/३ मात्रा द्यावयाची आहे.
   अ) एक वर्षाचे रोप – २०० ग्रॅम नत्र, २०० ग्रॅम पालाश
   ब) दोन वर्षाचे रोग – ४०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम पालाश
   क) तीन वर्षाचे रोप – ६०० ग्रॅम नत्र, ६०० ग्रॅम पालाश

ड) पाच वर्ष व त्यावरील माडास एक किलो नत्र अधिक एक किलो पालाश ही खते द्यावयाची आहेत.

सुपारी

१. बागेची स्वच्छता करा. काडीकचरा व पडलेली झावळे, शिंपुटे व सुपाऱ्या गोळा करुन कंपोस्ट/व्हर्मी कंपोस्ट करा.
२. पाण्याचे पाट स्वच्छ करा.
३. पावसाने अधिक ताण दिला असल्यास पाणी द्या.

काळीमिरी

१. वेलास योग्य प्रमाणात सावली करा.
२. पाऊस नसल्यास बागेत वेलाभोवती आवश्यकतेप्रमाणे पाणी देण्याची व्यवस्था करा.

पशुसंवर्धन

१. हिरव्या वैरणीच्या पिकांसाठी ओलीताखालील क्षेत्रामध्ये मका (आफ्रिकन टॉल) चवळी (इ.सी ४२१६) बियाणे पेरावे.

२. स्थानिक चाऱ्यापासुन मूरघास तयार करण्यासाठी स्थानिक गवत फुलांवर असताना कापणी करुन मूरघास तयार करा.

आंबा मोहोर संरक्षण पूर्वतयारी

१. फवारणी धुरळणी यंत्राची दुरुस्ती

२. तुडतुडयाच्या उपद्रवाकडे लक्ष द्या.

३. खालील औषधे संग्रहीत ठेवा.

४. सायपरमेथ्रीन (२५ टक्के) फेनव्हलरेट (२० टक्के) डेकॅमथ्रिन (२.८ टक्के) हेक्सॅकोनॅझोल ५ टक्के कार्बेडॅझीम ५० टक्के.

भाजीपाला

१. रब्बी पालेभाज्यांसाठी पूर्व मशागत पूर्ण करा.

२. मर्यादीत सिंचन उपलब्धतेत ३० दिवसात येण—या माठ, मुळा, पालक इत्यादी पालेभाज्या लावा.

३. सिंचन उपलब्धता असलेल्या ठिकाणी वांगी, टोमॅटो आणि मिरची या फळभाज्यांच्या रोपवाटिकेची काळजी घ्या.

४. खते व किटकनाशकांची तरतूद करा.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी
# शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश
## जिल्हा–रत्नागिरी/सिंधुदुर्ग
## कालावधी – नोव्हेंबर– डिसेंबर,

भात

अ) खरीप भात

१. पक्व भाताची कापणी वैभव विळयाने करा.
२. कापलेले भात शेतात चांगले पसरा आणि २ ते ३ दिवस उन्हात वाळवा.

ब) उन्हाळी भात

१. उन्हाळी लागवडीखालील शेताची नांगरट पूर्ण करा.
२. धस्कटे व काडीकचरा कंपोस्ट खडडयात टाका.
३. शेतीची बांधबंदिस्ती पूर्ण करा.
४. शेतात दर हेक्टरी १० ते १२.५ टन शेणखत/कंपोस्ट पसरा व मातीत मिसळा.
५. रोपवाटिकेची तयारी करा.
६. सुधारीत जातीचे बियाणे मिळवा. खतांची तरतूद करा.

नागली

१. गरव्या नागलीच्या तयार कणसांची खुडणी पूर्ण करा.
२. वाळलेल्या कणसांची मळणी करा.
३. रब्बी नागली (सिंधुदुर्ग)
   १. भाताप्रमाणे रोपवाटिकेची तयारी करा.
   २. बहुउत्पादित वाणांची पेरणी करा.

कडधान्य

१. हरभरा, कुळीथ, मूग, उडीद या पिकांची पेरणी राहीली असल्यास पूर्ण करा.
२. पेरणीपूर्वी कडधान्याच्या बियाण्यास २५० ग्रॅम/१० कि.प्रमाणे रायझोबियमचे जिवाणू संवर्धकांचा वापर करा.
३. पहिल्या पंधवरडयात पेरणी झालेल्या क्षेत्रात बेणणी करा.
४. उडीद व मूग पिकास जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांचे अंतराने पाणी द्या.
५. भटक्या गुरांपासून पिकांचे संरक्षण करा.

तेलबिया

१. खोल नांगरट करा.
२. ढेकळे फोडून जमीन तयार करा.
३. दर हेक्टरी १० ते १२ टन शेणखत/कंपोस्ट शेतात मिसळा व जमिन सारखी करुन घ्या.
४. पेरणीपूर्वी दर हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरदाची मात्रा बियाण्यांखाली पडेल अशी द्या. तथापि बियांचा खतांशी संपर्क होऊ देऊ नये. स्फुरद, बोरोनेटेड सुपर फॉस्फेट स्वरुपात दिल्यास उत्पन्न वाढते.
५. पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पेरणी पूर्ण करा. दर हेक्टरी १०० ते ११० किलो (दाणे) बियाणे पुरेसे आहे. बियाणांस बुरशीनाशकाची प्रक्रिया करा.
६. पेरणी टोकण पध्दतीने ३० ग १५ से.मी.अंतरावर करा.
७. पेरणीपूर्वी जमिन चांगली भिजवा व वापसा आल्यावर पेरणी करा.
८. पेरणीनंतर ३ दिवसांनी हलके पाणी द्या. उगवणाऱ्या बियांचे पक्षांपासून संरक्षण करा.

कलिंगड

१. शेताची खोल नांगरट करा व चांगली भुसभुशीत करा.

२. लागवडीसाठी ४ मीटर अंतरावर पाट काढावेत व पाटाच्या दोन्ही बाजूस ९० से.मी. अंतरावर ३० ग ३० ग ३० सें.मी आकाराचे खडडे घ्या. खडडयात प्रत्येकी एक घमेले चांगले कुजलेले शेणखत / गांडुळखत मिसळा व खडडा भरुन घ्या.

३. प्रत्येक खडडयात चार बिया पेरा. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन बुरशीनाशकाची प्रक्रिया (प्रति किलोस २ ग्रॅम) करा. दर हेक्टरी २.५ किलो बियाणे वापरा.

४. विशेष सूचना:— उशिरा लागवड झाल्यास उत्पन्नात घट येते आणि रोगाचे प्रमाणही वाढते.

५. बियांचा रुजवा झाल्यावर रोपांची विरळणी करुन प्रत्येक ठिकाणी दोन चांगली जोमदार रोपेच ठेवा. तसेच वेली वाफ्यावर वाढतील याची काळजी घ्या.

६. खताचे प्रमाण — दर हेक्टरी

अ. शेणखत— १५ टन

ब. नत्र — १५० किलो (३०० किलो युरिया)

क. स्फुरद — ५० किलो (३१२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट)

ड. पालाश — ५० किलो (८५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश)

शेणखत, स्फुरद व पालाशची पूर्ण मात्रा तसेच नत्राची १/३ मात्रा लागवडीच्या वेळी द्या. उरलेले नत्र लागवडीनंतर एक व दोन महिन्यांनी समप्रमाणात विभागून द्यावे.

७. जमिनीच्या मगदुराप्रमाणे ४ ते ५ दिवसाचे अंतराने पाणी द्या. बुंध्यालगत गवताचे आच्छादन करा. त्यामुळे गवताचे प्रमाण कमी होवून ओलावा टिकून रहाण्यास मदत होईल.

८.दोन ओळीतील रांगेत गिरीपुष्पाच्या पाल्याचे आच्छादन घाला म्हणजे तणांचा बंदोबस्त करता येईल.

९. तणांचा प्रादुर्भाव झाल्यास निंदणी करा अन्यथा किडींचा प्रादुर्भाव वाढतो.

भुरी

१. केवडा:— या रोगामुळे पानावर तपकिरी रंगाचे पिवळसर ठिपके दिसतात. रोगाचे बंदोबस्तासाठी १ लिटर पाण्यात २.५ ग्रॅम डायथेन झेड—७८ किंवा डायथेन एम—४५ औषधाचे मिश्रण या १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.

२. मर:— या रोगाने वेली मरताना दिसतात म्हणून बियाणे पेरतेवेळी एक किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा हर्जिॲनम या जैविक बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी. थायरम किंवा कॅप्टान चोळावे.

३. किडी:— मावा, पांढरी माशी व तुडतुडे.

या किडी पानाच्या खालच्या पृष्ठभागांवर राहून पानांतील रसाचे शोषण करतात. त्यामुळे पाने निस्तेज होऊन मरतात.

विशेष:— रोग व किडीच्या बंदोबस्तासाठी कलिंगडचे वेलावर गंधकाचा वापर करु नये. तसे केल्यास वेलांना इजा होण्याची शक्यता असते.

इतर भाजीपाला

१. पालेभाज्यांसाठी गादीवाफे तयार करा. गादीवाफयांवर शेणखताऐवजी गांडूळ खत वापरल्यास तणांचा प्रादुर्भाव कमी होतो.

२. स्थानिक मागणी लक्षांत घेऊन मूळा, माठ, चाकवत, चुका या भाज्यांची पेरणी करा. फेरपालटीने ही पिके घेण्यासाठी बियाण्याची तरतूद करा.

३. मिरची, वांगी, भेंडी व वेलभाज्यांच्या तयार फळांची काढणी करा.

४. जेथे शक्य असेल तेथे नवीन लागवड करा. या पीकांची नवीन लागवड/उगवण हिवाळयापुर्वी होईल यांची दक्षता घ्या.

५. वेलवर्गीय भाजीपाल्यावर विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच रोगग्रस्त वेल त्वरीत उपटून नष्ट करावेत म्हणजे रोगाचा पुढील प्रसार रोखता येईल.

# फलोद्यान

आंबा

१. सर्व फळबागातील झुडपे व वेली काढून स्वच्छता राखा.
२. गवत मोठया प्रमाणात असल्यास झाडाभोवती विस्तारापासून ३–४ मीटर अंतरावर अग्नीरोधक पटटा तयार करा.
३. नवीन कलमांना आधार द्या.
४. जोडाखालील बुंध्यावर येणारी वाढ वेळोवेळी खुडून टाका.
५. नवीन पालवीवर येणाऱ्या शेंडे अळीचा बंदोबस्त करा.
६. एक व दोन वर्षांच्या कलमांना सावली करा.
७. ठिबक पध्दतीने पाणी द्या. त्यामुळे ४० टक्के पाण्याची बचत होईल.
८. आंब्याच्या बागेत गडग्याचे कूंपण तयार करा व नवीन कलमांचे भटक्या गुरांपासून संरक्षण करा.
९. कलमांवर असलेली बांडगूळ तसेच सुकलेल्या निर्जिव फांद्या काढून झाडामध्ये सुर्यप्रकाश येईल याची खात्री करा.
१०.वाकलेल्या फांद्याना आधार द्या.
११.आंबा मोहराचे तुडतुडयांपासून संरक्षण करण्यासाठी पीक संरक्षण वेळापत्रकाप्रमाणे उपाययोजना करा. फवारणी खोडावर, पानांवर (दोन्ही बाजूस) व शेंडयावर पडेल याची काळजी घ्यावी.
१२. भुरी रोगाचा मोहोरावरील प्रादुर्भाव रोखण्यासाठी हेक्झॅकोनॅझोल या बुरशीनाशकाची फवारणी १० लि. पाण्यात ५ मिली. या प्रमाणात करावी.
१३.आंबा बागेत रक्षक सापळे प्रति हेक्टरी चार बसवावेत.

काजू

१. नवीन लागवडीतील कलमाचे बुंध्याखालील नवीन फुटवा काढून टाका.
२. ३० से.मी. पेक्षा उंच कलमांना काठीचा आधार द्या.
३. कलमाभोवतीचे गवत काढून बाग स्वच्छ ठेवा.

नारळ

१. नारळाच्या बागेतील काडीकचरा गोळा करुन नष्ट करा.
२. करपा रोगाची लक्षणे दिसताच २ ग्रॅम झायनेब प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.
३. खताचा दुसरा हप्ता ऑक्टोबरमध्ये दिला नसल्यास लवकरात लवकर द्या.
४. ४ ते ५ दिवसांनी पाणी द्या. बुंध्यालगत गवताचे आच्छादन करा.

सुपारी

१. बाग स्वच्छ ठेवा.
२. ४ ते ५ दिवसांनी पाणी द्या.

चिकू

१. जमिन हलवून झाडाभोवती पाणी देण्यासाठी अळी तयार करा.
२. ६ ते ८ दिवसाने पाणी देण्याची व्यवस्था करा.

केळी

१. केळीच्या बागेत ५ ते ६ दिवसांनी पाणी देण्याची व्यवस्था करा.
२. अनावश्यक मुनवे काढून टाका.
३. पर्णगुच्छ रोगग्रस्त झाड असल्यास अशी रोपे/झाडे समूळ नष्ट करा.
४. पोसावलेल्या केळींना आधार द्या. नर फूल काढून टाका.

काळीमिरी

१. नवीन वेलींना आधाराच्या झाडावर चढेपर्यंत बांधून वर चढवा.
२. वेलांना ४ ते ५ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्या.
३. आधाराच्या पांगाऱ्यावरील काही फांद्यांची छाटणी करा म्हणजे वेलींना पुरेसा सुर्यप्रकाश मिळेल.

पशुसंवर्धन

१. दुभत्या गायी व म्हशीची विशेष काळजी घ्या. त्यांना ओला चारा नियमित मिळेल याबाबींकडे लक्ष द्या.

२. चारा पीक फुलावर आले असता कापणी करा व त्यापासून मूरघास तयार करा.

३. गोचिडांपासून गुरांचे संरक्षण करा.

४. लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस टोचून घ्या.

५. शेळया मेंढयाना पोटातील जंत नष्ट होणेसाठी डॉक्टरांचे सल्याने औषधे द्या.

६. पेंढयाची प्रत सुधारण्यासाठी ४ टक्के युरीयाची प्रक्रिया करा.

सामाजिक वनीकरण

१. लावलेल्या झाडांचे संरक्षण करा.

## डिसेंबर पहिला पंधरवडा

भात

१. उन्हाळी भात लागवडीसाठी भात खाचरांत योग्य ओलावा असताना नांगरट करा.

२. नांगरलेल्या खाचरातील काडी कचरा गोळा करुन नष्ट करा.

३. शेताचे बांध सारखे करुन शेत समपातळीत आणा.

४. दर हेक्टरी १० ते १२.५ टन शेणखत/कंपोस्ट भात खाचरांत वापरा.

५. रोपवाटीकेत बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ट्रायसायक्लॅझोल ( ७५ टक्के ) या बुरशी नाशकाची फवारणी १० लि. पाण्यात १० ग्रॅम या प्रमाणात करावी.

रोपवाटीका

१. एक हेक्टर क्षेत्र भात लागवडीसाठी १० आर क्षेत्रात गादी वाफ्यावर रोपे तयार करा.

२. भात रोपवाटिकेत एक आर क्षेत्रात अर्धा टन शेणखत/कंपोस्ट या प्रमाणात मिसळा.

३. गादी वाफ्याची रुंदी १.२० मीटर व उंची ८ ते १० से.मी. ठेवा.

४. गादी वाफ्यावरील ढेकळे फोडून माती भुसभुसीत करा. तसेच पृष्ठभाग समपातळीत आणा.

५. गादी वाफ्यावर रुंदीत समांतर ७ ते ८ से.मी.अंतरावर २ ते ३ से.मी.खोलीच्या रेघा ओढा.

पेरणी

१. पेरणी २०डिसेंबरपूर्वी पूर्ण करा.

२. भाताचे प्रमाणित बियाणे तसेच प्रक्रिया केलेले बियाणे (थायरम २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे) पेरा.

३. बियाणे २ ते ३ से.मी.खोलीवर पेरा आणि चांगले झाकून घ्या.

४. गादी वाफ्यात पाणी द्या.

५.गादी वाफ्यात पाणी दिल्यानंतर ४ दिवसांनी ५० टक्के प्रवाही ब्युटाक्लोर ६ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारा.

बियाण्याचे प्रमाण – अ) बारीक दाण्याचे भात – ३५ कि/हे.<br>
ब) जाड दाण्याचे भात – ५० कि./हे.

उन्हाळी सुधारित जाती

१) रत्नागिरी–७३ २) कर्जत –१८४ ३)रत्नागिरी –७११<br>
४) रत्नागिरी–२४ ५) रत्नागिरी–१ ६) कर्जत – ३

विशेष सूचना

उन्हाळी हंगामात पाणी दीर्घकाळ उपलब्ध होणार असल्यास रत्नागिरी–१ किंवा 'रत्नागिरी–७११' किंवा 'जया' हे वाण घ्यावेत. अन्यथा इतर वाणापैकी एखाद्या वाणाची निवड करावी.

भुईमूग

शेंडेमर रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी भुईमुगाची पेरणी डिसेंबरच्या दुसऱ्या ते तिसऱ्या पंधरवडयापर्यन्त पूर्ण करावी.

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी

## शेतकऱ्यांना शेती कामासंबंधी द्यावयाचे संदेश

## रत्नागिरी / सिंधुदूर्ग

## कालावधी– डिसेंबर–जानेवारी

## डिसेंबर दुसरा पंधरवडा

भात

१. भात खाचरात पहिली नांगरट पूर्ण करा व बांध दुरुस्त करा.
२. पाण्याअभावी भातांची पेरणी राहिली असल्यास पूर्ण करा. पेरणेपुर्वी रोपवाटिका क्षेत्रास प्रति गुंठा १०० किलो कुजलेले शेणखत मातीत मिसळून द्यावे. वाफ्यात प्रति गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ८५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश या रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
३. पेरणी पूर्ण झाली असल्यास पंधरा दिवसांचे रोपवाटिकेस नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति आर क्षेत्रात १ कि. युरिया किंवा २.५ किलो अमोनियम सल्फेट द्या.

किडींचे नियंत्रण

ज्या भात खाचरात खोड किडींचा उपद्रव येतो, अशा भागातील खोड किडींचा बंदोबस्त करण्यासाठी पुढील उपाय योजना करावी. ही उपाययोजना नुकसान सिमारेषेच्या अधिक असेल तरच करावी. (एक चौरस मिटर क्षेत्रात एक अंडीपुंज/ एक पतंग ).

खोड किडींचे नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी जमिनीत दाणेदार किटकनाशके वापरावीत यासाठी प्रति हेक्टरी १० टक्के फोरेट १० किलो किंवा ५ टक्के क्विनॉलफॉस १५ किलो किंवा ३ टक्के कार्बाफयुरॉन १६.५ किलो वापरावे (जमिनीत पुरेसी ओल असताना).

फवारणी करावयाची झाल्यास ५०० लिटर पाण्यातून एक हेक्टर क्षेत्रावर १६०० मि.लि.२५ टक्के क्विनॉलफॉस किंवा कारटॅपहायड्रोक्लोराईड ५० टक्के ६०० ग्रॅम किंवा ४० टक्के ट्रायझोफॉस १३५० मिली.

- रोपवाटीकेत पाने गुंडाळणारी अळी आढळल्यास ५०० लिटर पाण्यात
- १. मोनोक्रोटोफॉस ७०० मिली. किंवा
- २. ॲसिफेट ७६ टक्के ५०० ग्रॅम
- ३. क्लोरपायरिफॉस २० टक्के १८७५ मिली.मिसळून फवारणी करा.

- रोपवाटीकेत करपा रोग दिसून आल्यास १ लिटर पाण्यात २.५ ग्रॅम कॉपर आक्सीक्लोराईड मिसळून फवारणी करा.

कडधान्ये

कडधान्य पिकांचे किडीपासून संरक्षण करा.

गळीतधान्ये (भुईमुग)

१. पेरणीनंतर हलके पाणी द्या व नंतर १० ते १२ दिवसांचे अंतराने पाणी द्या.
१. उगवून आलेल्या क्षेत्रात मावा किडींचा उपद्रव दिसून आल्यास २टक्के मिथील पॅरॅथिऑन भुकटी २० किलो प्रति हेक्टरी धुरळावी.
२. शेंडेमर रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी भुईमुगाची पेरणी डिसेंबरच्या दुसऱ्या ते तिसऱ्या आठवडयापर्यन्त पूर्ण करावी.

मोहरी

१. मोहरीच्या पिकामध्ये पेरणीनंतर एक महिन्याने विरळणी करणे अत्यंत महत्वाचे असते. त्यासाठी १५ दिवसांनी विरळणी करावी. साधारण १० ते १५ से.मी. वर एक रोप ठेवा.
२. मोहरीचे पिक पेरल्यानंतर एक महिन्याने उरलेली नत्राची अर्धी मात्रा (हेक्टरी ४५ किलो) ओळी शेजारी मातीत मिसळून द्यावे. पिकास पाणी द्या.

३. मावा, तुडतुडयांचा बंदोबस्त करा. त्यासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ६०० मि.लि. ५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारावे.

४. जमिनीच्या प्रकारानुसार १२ ते १५ दिवसांनी पाणी द्या.

५. पिकावर पांढरा तांबेरा अथवा केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कॉपर ऑक्सिक्लोराईड ( ५०टक्के) २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून पानांच्या मागील बाजूस फवारावे.

ऊस (सिंधुदुर्ग)

१. उपलब्ध पाण्याचा विचार करुन सुरु उसाची लागवड करावी. लागवडीपुर्वी हेक्टरी २५ किलो नत्र . १२५ किलो

सुपर फॉस्फेट . १२५ किलो पालाश या रासायनिक खतांची मात्रा द्यावी.

२. बियाणे आठ ते दहा महिने वाढलेले जाड रसरशीत असावे. हेक्टरी ३०,००० तीन डोळयाच्या टिप—या

(कांडया) लागतात.

३. कांडी लावताना डोळे बाजूला रहातील याची दक्षता घ्यावी

४. प्रथम पाणी देवून लागवड करावी व ३—४ दिवसांनी आंबवणीचे पाणी द्यावे

५. त्यानंतर १२ दिवसांचे अंतराने पाणी द्यावे.

## उद्यानविद्या विभाग

आंबा

आंबा मोहोराचे संरक्षण होणे अत्यंत महत्वाचे आहे. तुडतुडे, फुलकिडे, मिजमाशी तसेच भुरी या सारख्या किडी व रोगांनी मोहराचे अतोनात नुकसान होते. ते टाळण्यासाठी पीक संरक्षण औषधे फवारण्या वेळापत्रकानुसार करा.

विशेष सूचना

१. डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठाने सुचविलेल्या किटकनाशकाचे योग्य प्रमाण घेवून फवारणी करा.

पुन्हा—पुन्हा तीच किटकनाशके तसेच सुचविलेल्या प्रमाणापेक्षा जास्त अथवा कमी रसायन घेवून फवारणी

करणे टाळा.

२. फलधारणा झाली असल्यास तिस—या व चौथ्या फवारणीचेवेळी (म्हणजेच फळे, वाटाणा, सुपारी व अंडाकृती

असताना) किटकनाशकाच्या द्रावणात प्रति लिटर पाण्यात २० ग्रॅम पोटशियम नायट्रेट मिसळून फवारावे

. त्यामुळे फळांची गळ कमी होते व फळांना आकर्षक रंग येतो.

३. पंधरा दिवसांचे अंतराने औषधांची फवारणी करा तसेच बागेतील तुडतुडयांचा प्रादुर्भाव लक्षात घेवून फवारण्यांची

संख्या कमी—अधिक करा.

४. नवीन झाडांना सावली करा.

५. वाकलेल्या फाद्यांना आधार द्या.

६. नवीन लावलेल्या कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करा. त्यासाठी ठिबक संचाचा वापर करा. अशा कलमांच्या बुंद्यालगत गवताचे आच्छादन करा.

काजू

काजूच्या जुन्या झाडांना रोठा लागण्याची ाक्यता असते. त्यासाठी अशा झाडांची काळजीपूर्वक पहाणी करावी. विशे ा करुन पाने पिवळी पडणे , खोडातून डिंक/भुसा बाहेर येणे इ. लक्षणे दिसल्यास नियंत्रणाची ताबडतोब अंमलबजावणी करावी.

नारळ

१. बागेत ४ ते ५ दिवसांनी नियमितपणे पाणी द्या.

२. झाडासभोवती आळयात गवताचे अथवा झावळयांचे आच्छादन करा.

३. इरिओफाईड ग्रस्त गळलेली फळे किंवा रोगट फळे वेळीच जमा करुन खोल जमिनीत पुरुन टाका किंवा जाळून टाका.

४. नारळ बागेमध्ये उंदराचा प्रादुर्भाव दिसून आल्यास वि ारी आमि ाचा वापर करा. नारळ खोडाना एक फुट उंचीचा गॅल्वोनाईज पत्रा गोलाकार ठोका बागेच्या सभोवती असणाऱ्या इतर झाडांच्या फांद्या नारळाला टेकत असतील तर त्या छाटाव्यात..

सुपारी

१. सुपारी बाग स्वच्छ ठेवा.

२. नियमित ४ ते ५ दिवसांनी पाणी द्या.

३. दक्षिण बाधू नये म्हणून दक्षिणेकडील बाजूस गवत किंवा पानाच्या देठाने खोडास बांधून सावली करा.

काळीमिरी

१.पाणी कमी पडल्यास घोस गळून पडतात, म्हणून नियमित ४ ते ५ दिवसांनी पाणी द्या.

२. नवीन वेलांना आधार द्या व पाणी द्या, तसेच ५० टक्के सावली मिळेल अशी व्यवस्था कराकृ

*भाजीपाला*

१.टोमॅटो, मिरची, वांगी या पिकांतील सऱ्या मधून ५ ते ६ दिवसांनी पाणी द्या.

२. नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ५० किलो नत्र या प्रमाणात द्या म्हणजेच हेक्टरी १०८ किलो युरीया द्या.

कलिंगड

१. .नत्राची दुसरी मात्रा द्या.  यावेळी प्रत्येक अळयास ४५ ग्रॅम युरिया द्या. तत्पुर्वी अळयामधील गवत पुर्णपणे काढा.

२. ४ ते ५ दिवसांनी पाणी द्या. अळयालगत गवताचे आच्छादन करा.

३. पानांवर भुरी रोग दिसून आल्यास ५ मि.लि. कॅराथेन किंवा २५ ग्रॅम मॅन्कोझेब १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

४. वेलींवर मर रोग दिसून आल्यास १० लिटर पाण्यात १० ग्रॅम हेक्झाकॅप किंवा १० ग्रॅम कार्बेन्डेझीम मिसळून प्रत्येक वेलींच्या बुंध्याजवळ अर्धा लिटर मिश्रणाची भिजवण करा.

५. मर रोगाने मेलेले वेल मुळासकट गोळा करुन नष्ट करा.

६. तांबडे व काळे भुंगेरे, मावा, तुडतुडे इत्यादी किडींचा उपद्रव आढळून आल्यास. १० लिटर पाण्यात १० मि. लि. डायक्लोरव्हॉस मिसळून फवारणी करा.

महत्वाची सूचना

१. कलिंगडाच्या वेलीवर गंधकाची भुकटी धुरळू नये. तसेच बोर्डोमिश्रण फवारु नये.

२. कलिंगड उशिरा लावल्यास त्याचा परिणाम चव व आकार यावर होतो. तसेच फळमाशीचा उपद्रव वाढतो. फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथाईल युजेनॉल रसायनांचा रक्षक सापळा वापरावा.

३. पिकास पाणी देण्यामध्ये नियमितता ठेवा. अनियमित पाणी पुरवठयाचा कलींगडाच्या वाढीवर व फलधारणेवर विपरीत परिणाम होतो.

हिवाळी भाज्यांची लागवड

हिवाळी भाज्यांच्या लागवडीसाठी तयार केलेल्या टोमॅटो, वांगी, मिरची व कोबी या भाज्यांची रोपे ४ ते ५ आठवडयांची झाली असता सरीच्या एका बाजूवर मध्य भागांवर लावा. लागवडीपुर्वी रोपे कार्बेनडॅझीम १ ग्रॅम आणि डायमेथोएट १ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून या द्रावणात १ तासभर रोपांचे शेंडये बुडवून मगच लागवड करावी.   भाजीपाल्याच्या रोपांतील  अंतर –

१. टोमॅटो: ६० x ६० से.मी

२. वांगी: ७५ x ६० से.मी किंवा ६० x ६० सें.मी.

३. मिरची: ६० x ३० सेंमी. (हलकी जमीन) ६० x ४५ से.मी (भारी जमीन)

४. कोबी: ४५ x ४५ से.मी किंवा ६० x ६० से.मी

लावणीचेवेळी प्रती हेक्टरी खताची मात्रा

| अ.क्र. | खताचा प्रकार | वांगी | टोमॅटो | मिरची | कोबी |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेणखत | २० टन | २० टन | १५ टन | २० टन |
| १. | नत्र | ५० किलो | ५० किलो | ५० किलो | ६० किलो |
| २. | स्फुरद | ५० किलो | ७५ किलो | ५० किलो | ६० किलो |
| ३. | पालाश | ५० किलो | ५० किलो | ५० किलो | ६० किलो |

रोपांची लागवड संध्याकाळी करा

लागवडी अगोदर व लागवडीनंतर शेतास पाणी द्या.

४ ते ५ दिवसांनी नांगे भरा.

लागवडीनंतरच्या १५ दिवसांत ३ ते ४ दिवसांनी पाणी द्या.

केळी

१. केळीच्या बागेतील पर्णगुच्छग्रस्त नवीन मुनवे मुळासकट काढून त्यांचा जाळून अगर जमिनीत खोल पुरुन नायनाट करा.

२. डायमेथोएट १० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे

३. केळीना ४ ते ५ दिवसांनी नियमित पाणी द्या

४. घड आल्यानंतर प्रत्येक केळीच्या झाडाला एकच जोमदार मुनवा ठेवा

५. अति थंडी पडल्यास बागेस पाणी द्या व बागेत काडीकचरा जाळून धुर करा.

६. पानावर करपा असल्यास रोगग्रस्त पाने कापून नष्ट करावी.

*पशुसंवर्धन*

१. जेथे सिंचनाची सोय आहे अशा क्षेत्रात वैरणीसाठी चवळी, ओट आणि ऑफ्रिकन टॉल मका या जातीची पेरणी करा.

२. कोंबडयांच्या अंडयातून उबवलेल्या पिल्लांना लासोटा लस नाकातून द्या. सहाव्या आठवडयात देवी प्रतिबंधक लस आणि आठव्या आठवडयात मानमोडी प्रतिबंधक लस टोचून घ्यावी. लस टोचण्यापूर्वी कोंबडयांना जंतनाशक औषध पाजावे.

३. लाळया खुरकत रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास रोग प्रतिबंधक लस टोचून घ्या

४. गायी, म्हशीमध्ये वितांना अंग बाहेर पडल्यास गावठी पध्दतीने उपचार न करता पशुवैद्यकीय सल्ला घ्या.

५. जन्मलेल्या वासरांना दोन तासांचे आत चीक पाजा. चीक नसल्यास अंडयाचा बलक, एरंडेल तेल, कॉडलीव्हर ऑईल दुधामध्ये मिसळून पाजावे.

## जानेवारी, पहिला पंधरवडा

भात

वायंगणी भात

१. भात खाचरातील तणांची बेणणी करा.

२. भातास हेक्टरी ४० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्या.

उन्हाळी भात

१. रोपवाटीकेस दर आर क्षेत्रास १ किलो युरीया मधून नत्राचा दुसरा हप्ता द्या.

२. रोपवाटीकेस नियमित पाणी द्या.

३. भात लागवड करावयाच्या खाचरातील पूर्व मशागतीची कामे पूर्ण करा. अशा खाचरांची बांधबदिस्ती आणि धसकटे, काडीकचरा गोळा करणे इत्यादी कामे पूर्ण करा.

४. रोपे ५ ते ६ पानांची अथवा ३० ते ४० दिवसांची होताच लावणीची तयारी करा. त्यासाठी भात खाचरात पंकज चिखलणी यंत्राचे सहाय्याने चिखलणी करा.

५. लावणीपुर्वी फळीने शेत समपातळीत आणा.

६. लावणीपुर्वी ४० किलो नत्र + ५० किलो स्फुरद, + ५० किलो पालाश प्रति हेक्टर खतांची मात्रा द्या.

७. लावणी करताना दोन ओळीत २० से.मी. व दोन रोपात १५ से.मी. अंतर ठेवा

८. रोपे उभी व उथळ लावा. एके ठिकाणी ३ रोपे लावा. संकरीत वाणांची एके ठिकाणी एकच रोप लावा.

९. रोपे स्थिरावल्यावर हलके पाणी द्या. त्यानंतर नियमित पाणी देण्याची व्यवस्था करा.

कडधान्ये

१. कडवा वाल,, पावटा, उडीद, तूर, मूग, चवळी इ. पिकांचे मोकाट गुरांपासून संरक्षण करा

२. पाणी उपलब्ध असल्यास गरजेनुसार पाणी द्या.

३. नवीन लागवड केली असल्यास खारी व पक्षांपासून संरक्षण करा.

भुईमूग

१. भुईमुगाची पेरणी केलेल्या क्षेत्रातील नांग्या भरण्याच्या राहिल्या असल्यास त्या भरुन घ्या

२. तणांचा बंदोबस्त करा व पीक ४० दिवसांचे झाल्यावर पिकास स्वस्तिक औजाराने मातीची भर द्या.

३. पाने खाणाऱ्या अळींचा उपद्रव दिसून आल्यास ५० टक्के कार्बारील भुकटी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करा.

४. जमिनीच्या मगदूरानुसार ८ ते १० दिवसांचे अंतराने पाणी द्या.

मोहरी

१.मोहरीचे पीक एक महिन्याचे झाले असल्यास हेक्टरी ४५ किलो नत्राचा दुसरा हप्ता ओळी शेजारी मातीत मिसळून द्या.

२.तणांचा बंदोबस्त करा

३. पाणी १२ दिवसांचे अंतराने द्या

४. माव्यापासून संरक्षण करा. त्यासाठी ५०० मि.ली ३० टक्के डायमेथोएट प्रवाही ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

*ऊस*

१. पिकातील तणांचा बंदोबस्त करा

२. पाणी १२ दिवसांचे अंतराने द्या

३. मोकाट गुरांपासून संरक्षण करा.

४. सहा आठवडे झालेल्या ऊसांचे पिकास हेक्टरी १०० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्या.

———०००———